	+ १,७१,३२,१००.००		
	- १,७१,३६,१०९.००		
	९५,११,०८१.८०		
७,००,०००.००	२) प्रशिक्षण खर्च व अभ्यास दौरा तरतुद	७,६२,१४६.००	
	७,००,०००.००		
	+ ४,००,०००.००		
	- ३,३७,८५४.००		
	७,६२,१४६.००		
३२,३४,८५०.००	३) कर्मचारी ग्रॅच्युईटी तरतुद	४०,२६,०५५.००	
	३२,३४,८५०.००		
	+ २५,००,०००.००		
	- १७,०८,७९५.००		
	४०,२६,०५५.००		
0.00	४) संस्था जी.पी.एफ.	0.00	
	0.00		
	+ ५९,९४,४४४.००		
	- ५९,९४,४४४.००		
	0.00		
0.00	५) संस्था कर्मचारी रजा रोखीकरण तरतुद	१५,००,०००.००	
	१५,००,०००.००		
0.00	६) लेखापरिक्षण फी तरतुद	४०,००,०००.००	
	४०,००,०००.००		
५,३७,५२,३१४.८०	७) मुदत ठेवीवर देणे व्याज तरतुद	१,४४,००,३०७.४०	
	५,३७,५२,३१४.८०		
	+ १२,७७,९३,००२.००		
	- १६,७१,४५,००९.४०		
	१,४४,००,३०७.४०		

जि. प. व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. भंडारा. र. नं. ११५
* दि. ३१ मार्च २०२६ ताळेबंद *

मागील वर्षाचे आकडे दि. ३१/०३/२०२५	संपत्ती		चालु वर्षाचे आकडे दि. ३१/०३/२०२६
४१,३६,३९,२३१.२७	११) बँक मुदत ठेव	५८,४४,२४,०७८.००	
	४१,३६,३९,२३१.२७		
	+ ५६,४४,६२,१७२.००		
	- ३९,३६,७७,३२५.२७		
	५८,४४,२४,०७८.००		
---	१२) बँक मुदत ठेव येणे व्याज	३,४८,४४,४६०.००	
२०,७३,५३७.००	१३) एल.आय.सी. ग्रॅज्युईटी स्कीम	२०,७३,५३७.००	
६,१७५.००	१४) बी.एस.एन.एल. अमानत ठेव	४,५८६.००	
	६,१७५.००		
	- १,५८९.००		
	४,५८६.००		
५,०००.००	१५) जि. प. गोंदिया अमानत ठेव	५,०००.००	
१५०.००	१६) सहकार मंडळ नागपूर शेअर्स	१५०.००	
२५०.००	१७) सहकार संघ पुणे	२५०.००	
१,५००.००	१८) फोन अमानत ठेव	१,५००.००	
१००.००	१९) बुलढाणा अर्बन को-ऑप. सो. भाग खरेदी	१००.००	
३,०००.००	२०) महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था भाग खरेदी	३,०००.००	
---	२१) जिल्हा सहकारी पतसंस्थांचा संघ भाग खरेदी	५,०००.००	
८,२६,९७५.००	**३) सुपर गॅस गुंतवणुक**		८,२६,९७५.००
१,००,०००.००	१) सुपर गॅस अमानत ठेव	१,००,०००.००	
२,८९,२५०.००	२) सुपर गॅस सिलेंडर डिपॉझीट	२,८९,२५०.००	
२,४६,२५०.००	३) सुपर गॅस नवीन कनेक्शन चार्जेस	२,४६,२५०.००	
९८,४००.००	४) सुपर गॅस प्लो. स्टॉक डिपॉ.	९८,४००.००	
४७,४५०.००	५) सुपर गॅस प्लो. स्टॉक सिले. डिपॉ.	४७,४५०.००	
४५,६२५.००	६) सुपर गॅस प्लो. स्टॉक चार्जेस डिपॉ.	४५,६२५.००	
२,९९,९१,३७,२०९.२०	**४) कर्ज व आगाऊ रक्कमा**		३,२९,९३,८४,६५०.७३
२,९३,८४,१५,६०५.६८	१) सभासद कर्ज बाकी	३,२३,६४,३३,०५५.२१	
	२,९३,८४,१५,६०५.६८		
	+ १,६७,५०,९७,९१४.५४		
	- १,३७,७०,८०,४६५.०१		
	३,२३,६४,३३,०५५.२१		
४६,७०५.००	२) बँक सस्पेन्स खाते	४६,७०५.००	
३,९४०.००	३) एस. पी. सी. कर्ज	३,९४०.००	
२३.१०	४) एरोज कंपनी येणे	२३.१०	
९०,११,७४१.००	५) मुदत ठेव तारण कर्ज	१,०९,६७,९४५.००	
	९०,११,७४१.००		
	+ २,१६,९२,५३२.००		
	- १,९७,३६,३२८.००		
	१,०९,६७,९४५.००		
८७.४२	६) स्टेट कंझुमर्स फेडरेशन येणे	८७.४२	

जि. प. व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. भंडारा. र. नं. ११५

* दि. ३१ मार्च २०२६ ताळेबंद *

मागील वर्षाचे आकडे दि. ३१/०३/२०२५	देयता			चालु वर्षाचे आकडे दि. ३१/०३/२०२६
0.00	८) टी.डी.एस. खाते		0.00	
		३,९३,४१५.00		
		– ३,९३,४१५.00		
		0.00		
८,२९,६९0.00	९) लखपती योजनेवर देणे व्याज तरतुद		६,५५,७८५.00	
		८,२९,६९0.00		
		+ २0,१८,५७८.00		
		– २१,९२,४८३.00		
		६,५५,७८५.00		
३,४६,४८८.00	१0) जि. सा. ठेवीवर देणे व्याज तरतुद		१0,८१,0३२.00	
		३,४६,४८८.00		
		+ १,७२,३१,0२४.00		
		– १,६४,९६,४८0.00		
		१0,८१,0३२.00		
२,५५,२९,१२५.५0	**७) संचित नफा**		२,७४,0८,२३८.१६	२,७४,0८,२३८.१६
		२,५५,२९,१२५.५0		
		– २,५५,२३,४३१.११		
		+ २,७४,0२,५४३.७७		
		२,७४,0८,२३८.१६		

जि. प. व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. भंडारा. र. नं. ११५
* दि. ३१ मार्च २०२६ ताळेबंद *

मागील वर्षाचे आकडे दि. ३१/०३/२०२५	संपत्ती		चालु वर्षाचे आकडे दि. ३१/०३/२०२६
८,६८६.००	७) विजय सायकल स्टोर्स	८,६८६.००	
१७,५७९.००	८) बजाज इले. वर्धा देणे	१७,५७९.००	
५,१६,३२,८४२.००	९) कर्मचारी पगार तारण कर्ज	५,१९,०६,६३०.००	
	५,१६,३२,८४२.००		
	+ १,१९,४१,०३८.००		
	- १,१६,६७,२५०.००		
	५,१९,०६,६३०.००		
३,८५,३८,११७.९४	**५) कायम मालमत्ता**		४,२०,९२,३२६.९४
१,२६,९६९.००	१) शिल्लक मालसाठा	१,२६,९६९.००	
५९,२३,२४५.९५	२) इमारत मुख्यालय	६४,९८,२०७.९५	
	५९,२३,२४५.९५		
	+ ५,७४,९६२.००		
	६४,९८,२०७.९५		
३३,९८,१९४.००	३) इमारत शाखा गोंदिया	३३,९८,१९४.००	
१,२७,१५,१९५.००	४) इमारत शाखा साकोली (भूखंड + बांधकाम)	१,२७,१५,१९५.००	
९५,९२,८६४.१७	५) डेडस्टॉक	१,११,८४,९६३.१७	
	९५,९२,८६४.१७		
	+ १५,९२,०९९.००		
	१,११,८४,९६३.१७		
५२,६६,६७७.०५	६) फर्निचर	६२,६१,१७७.०५	
	५२,६६,६७७.०५		
	+ ९,९४,५००.००		
	६२,६१,१७७.०५		
११,९४,३७३.०७	७) टेम्पररी डेडस्टॉक	१५,८७,०२१.०७	
	११,९४,३७३.०७		
	+ ३,९२,६४८.००		
	१५,८७,०२१.०७		
५१६.५०	८) टुल्स खरेदी	५१६.५०	
३,२०,०८३.२०	९) सुपर गॅस गोडावून भंडारा	३,२०,०८३.२०	
५,७४,९२,०५५.००	**६) अग्रीम रकमा**		१०,१५,५७,१२५.८०
८,४४०.००	१) संचालक अग्रीम	८,४४०.००	
१९,३६८.००	२) संचालक लाभांष अग्रीम	१९,३६८.००	
१,०००.००	३) सपना मॅटस् अग्रीम	१,०००.००	
३,१५,०००.००	४) संस्था कर्मचारी दिवाळी अग्रीम	३,३०,०००.००	
	३,१५,०००.००		
	+ ५,५०,०००.००		
	- ५,३५,०००.००		
	३,३०,०००.००		
९५,८००.००	५) आमसभा बैठक भत्ता अग्रीम	९५,८००.००	
५,०००.००	६) चौकशी खर्च अग्रीम	५,०००.००	

जि. प. व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. भंडारा. र. नं. ११५

* दि. ३१ मार्च २०२६ ताळेबंद *

मागील वर्षाचे आकडे दि. ३१/०३/२०२५	देयता		चालु वर्षाचे आकडे दि. ३१/०३/२०२६
३,५९,२५,१४,१८७.८३	एकूण		४,११,३१,९०,८२८.९२

श्री. विलास फटे
प्रधान व्यवस्थापक

श्री. विजयकुमार डोये
उपाध्यक्ष

श्री. संजीव बावनकर
अध्यक्ष

जि. प. व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. भंडारा. र. नं. ११५

* दि. ३१ मार्च २०२६ ताळेबंद *

मागील वर्षाचे आकडे दि. ३१/०३/२०२५	संपत्ती		चालु वर्षाचे आकडे दि. ३१/०३/२०२६
५,०००.००	७) आर्कीटेक्ट अग्रीम	५,०००.००	
१०,००,०००.००	८) निवडणुक अग्रीम	०.००	
	१०,००,०००.००		
	– १०,००,०००.००		
	०.००		
---	९) घरभाडे अनामत ठेव शाखा कोहमारा	१,००,०००.००	
५,२८,९२,४४७.००	१०) शाखा गोंदिया कडून येणे अग्रीम	३,५२,९२,५४१.४०	
	५,२८,९२,४४७.००		
	+ २,१५,००,०००.००		
	– ३,९०,९९,९०५.६०		
	३,५२,९२,५४१.४०		
३१,५०,०००.००	११) शाखा कोहमारा कडून येणे अग्रीम	४,२३,५०,०००.००	
	३१,५०,०००.००		
	+ ६,१६,००,०००.००		
	– २,२४,००,०००.००		
	४,२३,५०,०००.००		
---	१२) शाखा आमगांव कडून येणे अग्रीम	२,३३,४९,९७६.४०	
	२,५३,५०,०००.००		
	– २०,००,०२३.६०		
	२,३३,४९,९७६.४०		
४०,८२,३४८.००	**७) बँक टी.डी.एस. येणे**	८२,५९,७१८.००	८२,५९,७१८.००
	४०,८२,३४८.००		
	+ ४३,६८,५१२.००		
	– १,९१,१४२.००		
	८२,५९,७१८.००		
३,००,०००.००	**८) शेप्ट अकाऊंट**		३,००,०००.००
३,५९,२५,१४,१८७.८३	एकूण		४,११,३१,९०,८२८.९२

श्री. विलास फटे
प्रधान व्यवस्थापक

श्री. विजयकुमार डोये
उपाध्यक्ष

श्री. संजीव बावनकर
अध्यक्ष

जि. प. व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. भंडारा. र. नं. ११५

खर्च तपशिल **अंदाज पत्रक** सन २०२६-२७

खर्च विवरण	सन २०२६-२७ ची तरतुद	सन २०२५-२६ ची तरतुद	सन २०२५-२६ ला झालेला खर्च	जास्त खर्च	कमी खर्च
छपाई व झेरॉक्स खर्च	१०,००,०००.००	९,५०,०००.००	९,३९,९५६.००	---	१०,०४४.००
आदरातिथ्य व सन समारंभ खर्च	१,००,०००.००	७५,०००.००	१,५८,१०५.००	८३,१०५.००	---
कायदेशीर सल्ला व कोर्ट खर्च	२,००,०००.००	२,५०,०००.००	१,७८,२००.००	---	७१,८००.००
प्रवास खर्च	८,५०,०००.००	९,५०,०००.००	६,५३,८०१.००	---	२,९६,१९९.००
टेलीफोन व टपाल खर्च	३,००,०००.००	३,००,०००.००	२,८८,८७९.००	---	११,१२१.००
आस्थापना खर्च	४,००,००,०००.००	३,५०,००,०००.००	३,२९,३१,५८३.००	---	२०,६८,४१७.००
दुरुस्ती व कार्यालय व्यवस्था खर्च	५,००,०००.००	५,००,०००.००	३,७१,३१४.००	---	१,२८,६८६.००
भाडे/कर/विमा/विद्युत	९,२०,०००.००	८,००,०००.००	८,३६,६३४.००	३६,६३४.००	---
संचालक सभा व आमसभा खर्च व बैठक भत्ता खर्च	७५,००,०००.००	७५,००,०००.००	७२,७८,३५६.००	---	२,२१,६४४.००
प्रशिक्षण खर्च व अभ्यास दौरा	---	५,००,०००.००	---	---	५,००,०००.००
बँक कमिशन	१,००,०००.००	१,५०,०००.००	५९,५८३.००	---	९०,४१६.२२
किरकोळ खर्च	९,००,०००.००	८,५०,०००.००	८,२९,९६८.००	---	२०,०३२.००
प्रकाशने	५,००,०००.००	५,००,०००.००	४,७२,०४०.००	---	२७,९६०.००
ऑडीट फी	२७,५०,०००.००	२७,००,०००.००	२७,१६,६६३.००	१६,६६३.००	---
देणगी	७५,०००.००	७०,०००.००	५२,५०१.००	---	१७,४९९.००
कर्मचारी पोशाख खर्च	१,००,०००.००	८०,०००.००	---	---	८०,०००.००
घसारा	१२,००,०००.००	१२,००,०००.००	११,३६,९२५.००	---	६३,०७५.००
सभासद ठेवीवर व्याज	७,२०,००,०००.००	७,००,००,०००.००	६,२१,१७,५८८.९३	---	७८,८२,४११.८७
जाहिरात खर्च	३,००,०००.००	३,००,०००.००	२,९६,९९१.००	---	३,००९.००
मुक्तप्रत्याय व ओ.डी.वरील व्याज	---	---	२७.००	२७.००	---
मुदत ठेव (मा.उ.) व्याज	१,१०,००,०००.००	८५,००,०००.००	१,०७,८०,६३४.००	२२,८०,६३४.००	---
स्टेशनरी व लेखन सामुग्री	३,५०,०००.००	३,२५,०००.००	३,३५,८६३.००	१०,८६३.००	---
फी/लायसेन्स	५०,०००.००	५०,०००.००	२८,९२६.००	---	२१,०७४.००
सहकार मंडळ वर्गणी	१०,०००.००	१०,०००.००	---	---	१०,०००.००
जिवन साफल्य ठेवीवर व्याज	१,३५,००,०००.००	१,४०,००,०००.००	१,७२,३१,०२४.००	३२,३१,०२४.००	---
मुदत ठेवीवर देणे व्याज	१३,५०,००,०००.००	११,७५,००,०००.००	१२,७७,९३,००२.००	१,०२,९३,००२.००	---
बचत ठेवीवर व्याज	३०,००,०००.००	३०,००,०००.००	२७,४८,६३६.००	---	२,५१,३६४.००
ई.पी.एफ. प्रशासकीय खर्च	२,६०,०००.००	२,००,०००.००	२,५८,२७१.००	५८,२७१.००	---
कर्मचारी बोनस तरतुद	---	२०,००,०००.००	---	---	२०,००,०००.००
एन.पी.ए. तरतुद	३५,००,०००.००	२५,००,०००.००	३२,०८,६१३.००	७,०८,६१३.००	---
एल.आय.सी. ग्रॅज्युईटी स्कीम	---	८,००,०००.००	---	---	८,००,०००.००
कॉम्प्युटर देखभाल खर्च	३,००,०००.००	३,००,०००.००	१,९८,७५०.००	---	१,०१,२५०.००
अतिरिक्त ठेवीवर देणे व्याज	१,००,००,०००.००	४५,००,०००.००	७७,६९,९८८.००	३२,६९,९८८.००	---
लखपती ठेवीवरील व्याज	३५,००,०००.००	२७,००,०००.००	२०,१८,५७८.००	---	६,८१,४२२.००
सॉफ्टवेअर देखभाल खर्च AMC	५,००,०००.००	५,००,०००.००	४,२४,८००.००	---	७५,२००.००
आयकर अपिल फाईल खर्च	२,५०,०००.००	२,५०,०००.००	२,३६,०००.००	---	१४,०००.००
आयकर सुनावणी खर्च	४,००,०००.००	४,००,०००.००	३,८९,४००.००	---	१०,६००.००
टी.डी.एस. रिटर्न फाईल खर्च	५०,०००.००	५०,०००.००	---	---	५०,०००.००
कार्यालय रंगरंगोटी खर्च	३,००,०००.००	३,००,०००.००	२,७१,९६१.००	---	२८,०३९.००
कार्यालय साफसफाई खर्च	२,५०,०००.००	२,५०,०००.००	२,०८,२००.००	---	४१,८००.००
सुरक्षा गार्ड खर्च	१,००,०००.००	१,००,०००.००	९०,०००.००	---	१०,०००.००
कोर्ट कारवाई खर्च	१,५०,०००.००	१,२५,०००.००	१,००,५००.००	---	२४,५००.००
व्यवसाय कर रिटर्न फाईल खर्च	५०,०००.००	५०,०००.००	२६,०००.००	---	२४,०००.००
एस.एम.एस. सुविधा खर्च	५०,०००.००	१,००,०००.००	२५,९६०.००	---	७४,०४०.००
कार्यालय नुतनीकरण खर्च	---	५०,०००.००	---	---	५०,०००.००
कर्मचारी ग्रॅज्युईटी तरतुद	३०,००,०००.००	२०,००,०००.००	२५,००,०००.००	५,००,०००.००	तरतुद जमा
सहकार प्रशि.खर्च व अभ्यास दौरा तर.	५,००,०००.००	---	४,००,०००.००	४,००,०००.००	तरतुद जमा
संस्था कर्म. रजा रोखीकरण तर.	---	---	१५,००,०००.००	१५,००,०००.००	तरतुद जमा
लेखापरिक्षण फी तरतुद	---	---	४०,००,०००.००	४०,००,०००.००	तरतुद जमा
भं. जि. पतसंस्थेचा संघ प्रवेश फी	---	---	६००.००	६००.००	---
शैक्षणिक व शिक्षण निधी	---	५,०००.००	---	---	५,०००.००
कर्मचारी भरती खर्च	२,००,०००.००	२,००,०००.००	१,१५,६३८.००	---	८४,३६२.००
डी.सी.पी.एस. आधार योजना	---	५,००,०००.००	---	---	५,००,०००.००
निवडणुक खर्च	---	---	८,०२,२९७.००	८,०२,२९७.००	---
आयकर रिटर्न फाईल खर्च	१,५०,०००.००	---	१,१८,०००.००	१,१८,०००.००	---
कर्मचारी दंड परत	---	---	५,०००.००	५,०००.००	---
एकूण	३१,५७,१५,०००.००	२८,३९,४०,०००.००	२९,४९,०५,७५५.९१	२,७३,१४,७२१.००	१,६३,४८,९६५.०९

श्री. विलास फटे
प्रधान व्यवस्थापक

श्री. विजयकुमार डोये
उपाध्यक्ष

श्री. संजीव बावनकर
अध्यक्ष

जि. प. व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. भंडारा. र. नं. ११५

उत्पन्न तपशिल

अंदाज पत्रक सन २०२६-२७

उत्पन्न विवरण	सन २०२६-२७ ची तरतुद	सन २०२५-२६ ची तरतुद	सन २०२५-२६ ला झालेला उत्पन्न	जास्त उत्पन्न	कमी उत्पन्न
सभासद कर्जावरील व्याज	२८,५०,००,०००.००	२७,००,००,०००.००	२६,५४,१२,०२५.००	---	४५,८७,९७५.००
बँक व्याज प्राप्त	३,००,०००.००	१०,००,०००.००	२,९५,६८२.००	---	७,०४,३१८.००
पगारतारण कर्जावरील व्याज	५०,००,०००.००	५५,००,०००.००	४६,२४,०७७.००	---	८,७५,९२३.००
राखीव निधी गुंतवणुक व्याज	४,५०,००,०००.००	२,५०,००,०००.००	४,९२,२८,६६३.६८	२,४२,२८,६६३.६८	---
लाभांष प्राप्त बी.डी.सी.सी. बँक	४,००,०००.००	४,००,०००.००	३,७५,०१४.००	---	२४,९८६.००
मुदत ठेव तारण कर्जावर व्याज	१०,००,०००.००	१०,००,०००.००	७,५२,८३८.००	---	२,४७,१६२.००
एन.पी.ए. तरतुद वसुल	२५,००,०००.००	२५,००,०००.००	१६,२०,०००.००	---	८,८०,०००.००
एकूण	३३,९२,००,०००.००	३०,५४,००,०००.००	३२,२३,०८,२९९.६८	२,४२,२८,६६३.६८	७३,२०,३६४.००

एकूण अपेक्षित उत्पन्न	–	३३,९२,००,०००.००
(–) एकूण अपेक्षित खर्च	–	३१,५७,१५,०००.००
अपेक्षित नफा	–	२,३४,८५,०००.००

जि. प. व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. भंडारा. र. नं. ११५
सन २०२५-२६ अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेला खर्च

अ. क्र.	खर्च विवरण	सन २०२५-२६ चा अंदाज	प्रत्यक्ष झालेला खर्च	अंदाजपत्रकापेक्षा झालेला खर्च	कारण
१	आदरतिथ्य व सण समारंभ खर्च	७५,000.00	१,५८,१०५.00	८३,१०५.00	आवश्यकतेनुसार
२	भाडे/कर/विमा/विद्युत	८,00,000.00	८,३६,६३४.00	३६,६३४.00	आवश्यकतेनुसार
३	ऑडीट फी	२७,00,000.00	२७,१६,६६३.00	१६,६६३.00	आवश्यकतेनुसार
४	मुक्त प्रत्याय व ओ.डी. वरील व्याज	-	२७.00	२७.00	आवश्यकतेनुसार
५	मुदत ठेव (मा.उ.) व्याज	८५,00,000.00	१,0७,८0,६३४.00	२२,८0,६३४.00	आवश्यकतेनुसार
६	स्टेशनरी व लेखन सामुग्री	३,२५,000.00	३,३५,८६३.00	१0,८६३.00	आवश्यकतेनुसार
७	जीवन साफल्य ठेवीवर व्याज	१,४0,00,000.00	१,७२,३१,0२४.00	३२,३१,0२४.00	आवश्यकतेनुसार
८	मुदत ठेवीवर देणे व्याज	११,७५,00,000.00	१२,७७,९३,00२.00	१,0२,९३,00२.00	आवश्यकतेनुसार
९	ई.पी.एफ. प्रशासकीय खर्च	२,00,000.00	२,५८,२७१.00	५८,२७१.00	आवश्यकतेनुसार
१0	एन.पी.ए. तरतुद	२५,00,000.00	३२,0८,६१३.00	७,0८,६१३.00	आवश्यकतेनुसार
११	अतिरिक्त ठेवीवर देणे व्याज	४५,00,000.00	७७,६९,९८८.00	३२,६९,९८८.00	आवश्यकतेनुसार
१२	कर्मचारी ग्रॅच्युईटी तरतुद	२0,00,000.00	२५,00,000.00	५,00,000.00	आवश्यकतेनुसार
१३	प्रशिक्षण खर्च व अभ्यास दौरा तरतुद	---	४,00,000.00	४,00,000.00	आवश्यकतेनुसार
१४	भंडारा जिल्हा पतसंस्थेचा संघ प्रवेश फी	---	६00.00	६00.00	आवश्यकतेनुसार
१५	निवडणुक खर्च	---	८,0२,२९७.00	८,0२,२९७.00	आवश्यकतेनुसार
१६	आयकर रिटर्न फाईल खर्च	---	१,१८,000.00	१,१८,000.00	आवश्यकतेनुसार
१७	संस्था कर्मचारी रजा रोखीकरण तरतुद	---	१५,00,000.00	१५,00,000.00	आवश्यकतेनुसार
१८	लेखापरिक्षण फी तरतुद	---	४0,00,000.00	४0,00,000.00	आवश्यकतेनुसार
१९	कर्मचारी दंड परत	---	५,000.00	५,000.00	आवश्यकतेनुसार
	एकूण	१५,३१,00,000.00	१८,0४,१४,७२१.00	२,७३,१४,७२१.00	

श्री. विलास फटे
प्रधान व्यवस्थापक

श्री. विजयकुमार डोये
उपाध्यक्ष

श्री. संजीव बावनकर
अध्यक्ष

जि. प. व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. भंडारा. र. नं. ११५

वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ३१/०८/२०२५

आज दिनांक ३१/०८/२०२५ रोज रविवारला दुपारी १.०० वाजता संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा ''लक्ष्मीरमा सांस्कृतिक सभागृह'' बाजार चौक, पवनी येथे संस्थेचे अध्यक्ष श्री. संजीव बावनकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री. दिनेश घोडीचोर, शाखाध्यक्ष भंडारा यांनी ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला पवनी येथे उपस्थित झाल्याबद्दल भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील उपस्थित सर्व सभासदांचे अभिनंदन व स्वागत केले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेला सुरुवात करण्यापूर्वी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, विद्येची देवता शारदा माता, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतीबा फुले, साने गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत घेण्यात आले. तसेच आर्थिक वर्ष सन २०२४-२०२५ मध्ये संस्थेचे दिवंगत झालेले मान्यवर सभासदांचे वाचन करुन शास्त्रज्ञ, समाज सेवक, थोर साहित्यीक, क्रिडापट्टू, शिक्षण तज्ञ, शहिद जवान यांना १ मिनिट उभे राहून मौन श्रद्धांजली अर्पण केली. यानंतर संस्थेचे तथा आजच्या सभेचे अध्यक्ष श्री. संजीव बावनकर यांनी विषयसुचीनुसार आमसभेच्या कामकाजास सुरुवात करावी अशी विनंती केली व आपले प्रास्ताविक संपविले.

त्यानंतर मा. अध्यक्ष यांनी भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील आमसभेला पवनी येथे उपस्थित सर्व मान्यवर सभासदांचे स्वागत केले. संस्थेच्या संचालक मंडळाने दिनांक २८ ऑगस्ट २०२३ ला संस्थेचा पदभार स्विकारुन २ वर्ष पूर्ण झालेले आहेत. ह्या २ वर्षाच्या काळात संस्थेच्या कार्यकारी मंडळाने सभासदांच्या हिताचे अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत व त्याची अंमलबजावणी सुरु आहे. तसेच काही विषय आजच्या सभेत मंजुरीस्तव प्रस्तावित केलेले आहेत अशी माहिती सभेला दिली व कार्यकारी मंडळाने मागील २ वर्षात घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णयाचे वाचन केले.

१) एप्रिल २०२५ पासून संस्थेच्या सर्व शाखेत बचत ठेव योजना सुरु करण्यात आली आहे.

२) गोंदिया जिल्ह्यातील सभासदांकरीता ७.५ टक्के व्याज दराने अतिरिक्त ठेव योजना सुरु करण्यात आलेली आहे.

३) नविन सभासदांना रु. १० लाख पर्यत कर्ज सुविधा.

४) सर्वसाधारण कर्ज मर्यादा १८ लक्ष वरुन २५ लक्ष पर्यंत सुरु आहे व ४४ लक्ष रुपयापर्यंतचा विषय आजच्या सभेत प्रस्तावित आहे.

५) आकस्मिक कर्ज मर्यादा २० हजार वरुन ५० हजार रुपयापर्यंत करण्यात आली व आजच्या सभेत ते ८० हजार करण्याचा विषय प्रस्तावित आहे.

६) संस्थेचे एकूण एन.पी.ए. कमी करण्यात आले.

७) गोंदिया जिल्ह्यात कर्ज वाटप नियमित सुरु करण्यात आले आहे.

८) बँक गुंतवणुक ९,२०,९६,३६४/- वरुन ४१,३६,३९,२३१.२७ वर नेली.

९) मागील वर्षीच्या तुलनेत संस्थेचा नफा ४२,१४,५४७.४१ रु. ने वाढविला.

१०) संस्थेची कल्याण निधीमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत १,५३,९५,२८०/- रु. ने वाढ झाली असून कल्याण निधी (-) २८,७७,६८६/- वरुन (+) २९,८९,६०२/- वर्षाअखेर शिल्लक आहे.

११) सभासदांच्या मागणीनुसार व सभासदांच्या सेवेकरीता भंडारा जिल्ह्यात पवनी व गोंदिया जिल्ह्यात आमगांव येथे संस्थेच्या शाखा सुरु करण्यात आल्या आहेत.

१२) संस्थेच्या भंडारा व गोंदिया जिल्ह्यात विभाजनाकरीता संचालक मंडळ प्रयत्नशील असून भंडारा व गोंदिया जिल्ह्याचे प्रमाण ७०.७५% व २९.२५% वरुन ६६.५०% व ३३.५०% पर्यंत पोहचवले अशी माहिती दिली व संस्थेच्या विभाजनाकरीता संचालक मंडळ प्रयत्नशील असून येणाऱ्या काळात विभाजनाचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात येईल. असे सांगून उपस्थित सभासदांना धन्यवाद दिले व आपले प्रास्ताविक संपविले व विषयसुचीनुसार सभेला सुरुवात करण्यात आली.

विषय क्र. १ :- वार्षिक सर्वसाधारण सभेचे अहवाल वाचन करणे.

ठराव क्र. १ :- उपरोक्त विषयाचे अनुषंगाने संस्थेचे अध्यक्ष यांनी आजच्या सभेचे अहवाल वाचन केले. संस्थेला अहवाल वर्ष सन २०२४-२५ मध्ये एकूण निव्वळ नफा २,५५,२३,४४८.५४ एवढा झालेला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत संस्थेला ४२,१४,५४७.४१ रुपये एवढा जास्त नफा झालेला आहे अशी माहिती दिली. त्यावर श्री. सुधीर माकडे सभासद यांनी संस्थेच्या नफ्यात मागील वर्षीच्या तुलनेत वाढ झाली असून भरघोष नफा मिळवून दिल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळ व कर्मचारी यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव सादर केला. त्यावर श्री. जयंत तुरस्कर, सभासद यांनी अनुमोदन दिले व इतर सभासदांनी टाळ्या वाजवून अभिनंदन केले. त्यावर मा. अध्यक्ष यांनी संस्थेच्या सन्माननिय सभासद महोदयांच्या सहकार्यामुळे शक्य झाले असून सर्व सभासदांना धन्यवाद दिले व आभार मानले.

वरीलप्रमाणे सविस्तर चर्चा करुन आजची सभा सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात निव्वळ नफा २,५५,२३,४४८.५४ मिळवून दिल्याबद्दल मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करते व सन २०२४-२०२५ च्या सर्वसाधारण सभेच्या अहवालास सर्वानुमते मंजुरी प्रदान करते.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. २ :- मागील दिनांक ११/०८/२०२४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

ठराव क्र. २ :- उपरोक्त विषयान्वये संस्थेच्या सर्व सन्माननिय सभासदांना संस्थेच्या संचालकांतर्फे अहवाल वाटप केलेले आहे. त्यामध्ये अहवाल पेज क्र. २७ ते ३८ मध्ये मागील दिनांक ११/०८/२०२४ च्या आमसभेचे इतिवृत्त देण्यात आले अशी माहिती मा. अध्यक्ष यांनी सभेला दिली.

त्यावर श्री. संदिप तिडके, श्री. योगेश पुडके सभासद यांनी मागील सभेच्या इतिवृत्तामधील विषय क्र. १२, १३ व १४ हे रद्द झालेले असतांना संस्थेच्या शाखा पवनी व आमगांव कशा काय सुरु करण्यात आल्या असा प्रश्न केला. तर श्री. एस. यू. वंजारी यांनी या विषयावर विस्तृत माहिती देण्यात यावी अशी मागणी केली.

त्यावर मा. अध्यक्ष यांनी मागील सभेचे विषय क्र. १२ व १३ सभासदांच्या आग्रही मागणी वरुन स्थगित झालेले होते. तर विषय क्र. १४ मध्ये आमगांव तालुक्यातील सभासदांच्या मागणी नुसार सदर विषयावर विस्तृत चर्चा झाली होती. पवनी व आमगांव येथील सभासदांना संस्थेशी आर्थिक व्यवहार करण्याकरीता ४५ ते ७० कि.मी. अंतरावरुन स्पेशल रजा घेवून भंडारा व गोंदिया येथे जावे लागत असे. सदर गैरसोय टाळण्याकरीता व सभासदांची आग्रही मागणी लक्षात घेवून भंडारा जिल्ह्यात पवनी व गोंदिया जिल्ह्यात आमगांव येथे शाखा सुरु करण्यासंबंधी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ११/०८/२०२४ ठराव क्र. १४ नुसार व संचालक मंडळाची सभा दिनांक २५/०१/२०२५ ठराव क्र. ६ अन्वये ठराव झालेला आहे व त्यानुसार मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना दिनांक २०/०२/२०२५ ला भंडारा जिल्ह्यात पवनी व गोंदिया जिल्ह्यात आमगांव येथे शाखा सुरु करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी संस्थेची आर्थिक स्थिती व नवीन शाखा सुरु झाल्यानंतर व्यवसायाचे नियोजन याची तपासणी करुन संस्थेचे अध्यक्ष व प्रधान व्यवस्थापक यांची सुनावणी घेतली. त्यानंतर संस्थेला दिनांक १७/०४/२०२५ ला पत्र क्र. शाखा विस्तार/२०४/२०२५ चे शाखा मंजुरीचे पत्र प्राप्त झाले व त्यानुसार भंडारा जिल्ह्यात पवनी व गोंदिया जिल्ह्यात आमगांव येथे नवीन शाखा सुरु करण्याची परवानगी मिळालेली आहे व त्यानुसार पवनी येथे दिनांक १० मे २०२५ ला व आमगांव येथे दिनांक २२ जून २०२५ पासून शाखा सुरु झालेल्या आहेत अशी माहिती दिली व प्रश्नकर्त्या सभासदांचे समाधान केले. त्यावर श्री. सुधीर माकडे सभासद यांनी पवनी येथे संस्थेची शाखा सुरु केल्याबद्दल अध्यक्ष व संचालक मंडळाचे अभिनंदन केले. तसेच श्री. सुशिल बन्सोड, सभासद यांनी गोंदिया जिल्ह्यात आमगांव येथे शाखा सुरु करुन सभासदांना होणारा त्रास कमी केल्याबद्दल अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन केले व आभार मानले.

वरीलप्रमाणे सविस्तर चर्चा करुन आजची सभा दिनांक ११/०८/२०२४ च्या सर्वसाधारण सभेच्या कार्यवृत्तास मंजुरी प्रदान करते व तसा ठराव सर्वानुमते पारित करते.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ३ :- संचालक मंडळाच्या शिफारसीनुसार दिनांक ३१/०३/२०२५ अखेरचे जमाखर्च, नफातोटा पत्रक व ताळेबंद पत्रक स्विकारुन त्यास मंजुरी प्रदान करणे.

ठराव क्र. ३ :- उपरोक्त विषयान्वये आर्थिक वर्ष सन २०२४-२०२५ चे वार्षिक जमाखर्च, नफातोटा पत्रक व ताळेबंद पत्रक अहवाल पेज क्र. ९ ते ११, पेज क्र. १२ ते १३ व १४ ते २१ वर नमुद असून त्यास मंजुरी प्रदान करावी अशी विनंती मा. अध्यक्ष यांनी सभेला केली.

त्यावर श्री. संदिप तिडके, सभासद यांनी संचालक सभा व शाखा नियंत्रण सभा यावर विस्तृत माहिती देण्यात यावी अशी मागणी केली. त्यावर अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे माहिती सादर केली.

संचालक सभा व शाखा नियंत्रण सभा :- संचालक मंडळाची दर महिन्याला १ सभा याप्रमाणे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात १२ सभा व गरजेनुसार विशेष सभा ३ अशा एकूण १५ सभा मुख्यालयात घेण्यात आल्या. तसेच शाखा नियंत्रण समितीच्या ४ शाखा मिळून वर्षाच्या ४८ सभा घेण्यात आलेल्या आहेत. अशा एकूण ६३ सभा झालेल्या आहेत. सदर सभेकरीता संचालक महोदयांना बैठक भत्ता, सभा भत्ता, जाण्या-येण्याचा खर्च देय असतो. त्यावरील संपूर्ण खर्च १२,०५,४६३/- रु. झालेला आहे. अशी माहिती सभेला दिली. त्यावर श्री. संदिप तिडके, सभासद यांनी २,०००/- रु. बैठक भत्ता कधीपासून लागु झालेला आहे असा प्रश्न केला. त्यावर अध्यक्ष महोदय यांनी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांची अधिसुचना दिनांक ०५ जुलै २०२३ नुसार व कार्यकारी मंडळाची सभा दिनांक २५/०१/२०२५ ठराव क्र. ५ अन्वये बैठक भत्ता लागु करण्यात आला आहे अशी माहिती दिली व प्रश्नकर्त्या सभासदांचे समाधान केले.

किरकोळ खर्च :- संस्थेचे सभासद श्री. एस. यू. वंजारी यांनी किरकोळ खर्चाबाबत माहिती देण्यात यावी अशी मागणी केली. त्यावर अध्यक्ष यांनी संस्थेमध्ये सभासदांच्या सोयीकरीता चहापाण्याची सोय करण्यात येते. तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात विविध कर्मचारी संघटनेच्या व सेवानिवृत्त संघटनेच्या सभा मुख्यालयाच्या सभागृहात घेण्यात आल्या. तसेच शाखा गोंदिया येथे सभासद संघटनेच्या सभा शाखा साकोली कार्यालय इमारतीमध्ये सभासद संघटनेच्या सभा झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांना चहा व नास्त्याची सोय करण्यात आली. त्यावर सर्व शाखा व मुख्यालय मिळून ७,९९,९१९/- रु. एवढा खर्च झालेला आहे अशी माहिती दिली व प्रश्नकर्त्या सभासदांचे समाधान केले.

एन.पी.ए. खर्चाबाबद :- श्री. टी. आय. पटले, सभासद यांनी एन.पी.ए. विषयी प्रश्न केला. त्यावर अध्यक्ष यांनी एन.पी.ए. बाबद माहिती सादर केली. संशयीत व बुडीत कर्ज निधी म्हणजे एखादे खात्यावरील व्याज/कर्जाचा हप्ता हा ठरवून दिलेल्या कालावधी नंतरही वसुल न झाल्यास असे खाते **NPA (Non Performing Assets)** म्हणजेच अनुत्पादक जिंदगी होय. दिनांक १४/११/२००४, ना बँका/डी ४/पतसंस्था/**NPA**/८०९/२००४ सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म. रा. पुणे १ अन्वये संस्थेला **NPA** ची तरतुद दिनांक ३१/०३/२००५ पासून लागु करण्यात आली. संस्थेच्या कर्जविषयक बाबींचा विचार केल्यास संस्थेकडून मोठ्या प्रमाणात कर्ज वाटप होत आहे. संस्थेचे सभासद हे जि. प. सेवेतील असल्यामुळे सभासदांचे रजेवर जाणे निलंबन, मेडीकल रजा इत्यादी कारणास्तव वेतन विलंबाने होत असून कपात मागणीनुसार होत नाही. संस्था वाढीच्या मापदंडानुसार **NPA** चे कर्जाशी प्रमाण ५% पेक्षा कमी असावे असे आहे. त्यानुसार संस्थेच्या एकूण **NPA** चे कर्जाशी प्रमाण १.५% आहे. तसेच वसुलीकरीता एकूण १९६ केसेस सहकार न्यायालय, नागपूर येथे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी कर्ज भरल्यामुळे ३८ केसेस विड्रॉल झाल्या त्यापैकी ९ सभासदांची **NPA** ची रक्कम रु. १४,७०,८०८/- **NPA** तरतुदीमधून वसुल दाखविण्यात आली आहे. आमचे संचालक मंडळ यापुढे **NPA** शुन्यावर आणण्याकरीता प्रयत्न करत आहेत. अशी माहिती दिली व प्रश्नकर्त्या सभासदांचे समाधन केले.

ऑडीट फी :- श्री. सचिन कुथे, सभासद यांनी ऑडीट व ऑडीटरची पात्रता याविषयी माहिती देण्यात यावी अशी मागणी केली. त्यावर मा. अध्यक्ष यांनी अहवालात असलेली ऑडीट फी आर्थिक वर्ष २०२३-२०२४ च्या रुपये ३,१०,०४,३४,६७३.११ ह्या खेळते भांडवलावर आधारीत आहे. खेळते भांडवलावर ऑडीट फी दिनांक १५ मे १९९२ च्या मा. सहकार आयुक्त, पुणे यांच्या पत्रानुसार आकारण्यात आलेली आहे. तसेच संस्थेत वैधानिक ऑडीट हे वर्षातून एकदा होत असते. त्याकरीता ऑडीटर हा सनदी लेखापाल असावा. ऑडीटवरच्या नावाची नोंद सहकार विभागाच्या ऑडीट पॅनलवर असावी. ऑडीटर हा सहकार कायद्यानुसार आवश्यक अनुभव असलेला व अ वर्गीय असावा. सलग ३ वर्षापेक्षा जास्त एकाच संस्थेचे ऑडीट करता येणार नाही अशी ऑडीटरची पात्रता असते. अशी माहिती मा. अध्यक्ष यांनी सभेला दिली व प्रश्नकर्त्या सभासदांचे समाधान केले.

कल्याण निधी खर्च :- श्री. संदिप तिडके सभासद यांनी कल्याण निधीचा खर्च नफ्यातून करण्यात यावा अशी मागणी केली. त्यावर मा. अध्यक्ष यांनी संस्थेच्या स्थापनेपासून कल्याण निधी हा स्वतंत्र हेड असल्याने त्यात दरमहा निधी जमा होतो व त्यामधून मृत सभासदांच्या कुटूंबांना रु. २०,०००/- प्रमाणे वेळेत मदत केली जाते. तसेच सेवानिवृत्त सभासदांना जेवढी कल्याण निधी जमा होईल त्याच्या दुप्पट किंवा २०,०००/- यापैकी जे कमी असेल तेवढा निधी परत केला जातो. तसेच सभासदांचे गुणवंत पाल्यांचा सत्कार, आदर्श शिक्षक/कर्मचारी, सेवानिवृत्त सभासद यांचा सपत्नीक सत्कार समारंभ त्यांच्या येण्याजाण्याचा खर्च, कार्यक्रमात चहा, जेवण व नास्त्याचा खर्च, सन्मानचिन्ह शाल, श्रीफळ इत्यादी बाबीवर खर्च होत असतो. अशी माहिती दिली व सभासदांचे समाधान केले.

संस्थेची गुंतवणुक :- संस्थेची गुंतवणुक कोणकोणत्या बँकेत केलेली आहे असा प्रश्न श्री. संजय भांडारकर सभासद यांनी केला.

त्यावर मा. अध्यक्ष यांनी मुदत ठेवीमध्ये येणाऱ्या रक्कमेत वाढ झाल्यामुळे सदर रक्कम चालू खात्यावर बिनव्याजी ठेवण्यापेक्षा तो निधी ठेवीच्या स्वरुपात बी.डी.सी.सी. बँक, बुलढाणा अर्बन क्रेडीट को-ऑप सोसायटी, आयसीआयसीआय बँक, इक्विटस बँक व अन्य ज्यादा व्याज देणाऱ्या बँकामध्ये संस्थेची गुंतवणुक केलेली आहे. अशी माहिती दिली व प्रश्नकर्त्या सभासदांचे समाधान केले.

वरीलप्रमाणे सविस्तर चर्चा करुन आजची सभा सन २०२४-२०२५ चे वार्षिक जमाखर्च, नफातोटा पत्रक व ताळेबंद पत्रकास मंजुरी प्रदान करते व तसा ठराव पारित करते.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ४ :- संचालक मंडळाच्या शिफारसीनुसार दिनांक ३१/०३/२०२५ च्या नफा विनीयोगास मंजुरी प्रदान करणे.

ठराव क्र. ४ :- उपरोक्त विषयान्वये सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात संस्थेला २,५५,२३,४४८.५४ एवढा नफा झालेला आहे. त्याचा विनियोग अहवाल पेज क्र. ६ वर नमुद असून ते खालीलप्रमाणे आहेत.

१)	राखीव निधी २५%	रु. ६३,८०,८६२.१४
२)	लाभांष वाटप १५% (३१ मार्च २०२५ च्या भागभांडवलावर)	रु. १,७१,३२,१००.००
३)	लाभांष समकरण निधी	रु. ५,१०,४६८.९७
४)	इमारत निधी	रु. १५,००,०००.००
५)	शिल्लक बाकी	रु. १७.४३
		रु. २,५५,२३,४४८.५४

वरिल नफा विनियोगास आजच्या सभेने मंजुरी प्रदान करावी अशी विनंती मा. अध्यक्ष यांनी सभेला केली. त्यावर सविस्तर चर्चा करुन प्रस्तावित नफा विनीयोगास आजची सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करते व तसा ठराव पारित करते.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ५ :- संचालक मंडळाच्या शिफारसीनुसार सन २०२५-२०२६ चे अंदाजपत्रक स्विकारणे.

ठराव क्र. ५ :- उपरोक्त विषयान्वये संस्थेचे सन २०२५-२०२६ ह्या आर्थिक वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक अहवाल पेज क्र. २४ व २५ वर मंजुरीस्तव प्रस्तावित केलेले आहे. त्यास मंजुरी प्रदान करावी अशी विनंती मा. अध्यक्ष यांनी सभेला केली.

त्यावर सविस्तर चर्चा करुन आजची सभा संस्थेच्या सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करते.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ६ :- संचालक मंडळाच्या शिफारसीनुसार सन २०२४-२०२५ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी प्रदान करणे.

ठराव क्र. ६ :- उपरोक्त विषयान्वये आर्थिक वर्ष सन २०२४-२०२५ ह्या आर्थिक वर्षात काही बाबी जसे टेलीफोन व टपाल खर्च, भाडे, कर, विमा, विद्युत खर्च, बँक कमिशन, प्रकाशने, घसारा, मुदत ठेव (मा.उ.) व्याज, मुदत ठेवीवर देणे व्याज, संशयीत व बुडीत कर्ज निधी, कॉम्प्युटर देखभाल खर्च, अतिरिक्त ठेवीवर देणे व्याज, आयकर अपिल फाईल खर्च,

SMS सुविधा खर्च, कार्यालय नुतनीकरण खर्च, कर्मचारी ग्रॅज्युईटी तरतुद, प्रशिक्षण व अभ्यास दौरा तरतुद बुलढाणा अर्बन प्रवेश फी, शैक्षणिक व शिक्षण निधी इत्यादी बाबीवर अंदाजपत्रकापेक्षा जास्त खर्च झालेला असून आवश्यकतेनुसार व नियमानुसार झालेला आहे. त्याची विस्तृत बाबनिहाय माहिती अहवाल पेज क्र. २६ वर नमुद आहे. करीता त्यास मंजुरी प्रदान करावी अशी विनंती मा. अध्यक्ष यांनी सभेला केली.

त्यावर सविस्तर चर्चा करुन आजची सभा असा ठराव करते की, संस्थेचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेला खर्च हा संस्थेच्या आवश्यकतेनुसार व योग्य कारणास्तव झाल्यामुळे त्यास मंजुरी प्रदान करते व तसा ठराव पारीत करते.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ७ :- संस्थेचे सन २०२४-२०२५ च्या लेखापरिक्षणाचे दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी प्रदान करणे.

ठराव क्र. ७ :- उपरोक्त विषयान्वये संस्थेचे सन २०२४-२०२५ चे लेखापरिक्षणाचे दोषदुरुस्ती अहवाल आजच्या सभेत सादर करण्यात आले. त्यावर श्री. एस. यू. वंजारी, सभासद यांनी लेखापरिक्षणात कोणते दोष आढळले आहे ते सभेला सांगावे अशी मागणी केली. त्यावर अध्यक्ष यांनी सन २०२४-२०२५ चे लेखापरिक्षण पूर्ण झालेले असून त्यातील आक्षेपांचे व दुरुस्ती अहवालाचे सुद्धा वाचन केले.

त्यावर सविस्तर चर्चा करुन सन २०२४-२०२५ या वर्षातील संस्थेच्या लेखापरिक्षणात गंभीर दोष नसल्यामुळे तसेच दोषाचे अनुपालन संस्थेच्या व्यवहाराशी सुसंगत असल्यामुळे त्यास आजची सभा मंजुरी प्रदान करते व त्यानुसार अंमलबजावणी करुन लेखापरिक्षणातील दोषांचे अनुपालन करण्यात यावे असे ठरवून तसा ठराव पारीत करण्यात आला.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ८ :- संस्थेचे सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरीता लेखापरिक्षकाची नियुक्ती करण्याबाबद मंजुरी प्रदान करणे.

ठराव क्र. ८ :- उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण करण्याकरीता खालील सी. ए. चे अर्ज प्राप्त झाले ते पुढीलप्रमाणे - १) मे. पिल्ला माथुर, मनुजा ॲन्ड कंपनी, सी.ए. १०२, पहिला माळा, मंगलम् श्रद्धा अपार्टमेंट, कमर्शियल विंग, गणेश पेठ, नागपूर, २) मे. मनिष जैन ॲन्ड कंपनी, सी. ए., मधुमाधव टॉवर, लक्ष्मी भवन चौक, धरमपेठ, नागपूर, ३) मे. पानीया चंदवानी ॲन्ड कंपनी, सी. ए., कामदार कॉम्पलेक्स, सी.ए. रोड, नागपूर, ४) एम.टी.एस. ॲन्ड असोसिएटस्, गिरीराज निकुंज, नवजीवन कॉलोनी, वर्धा रोड, नागपूर. ५) डी.पी.एस.एस. ॲन्ड कं. एल.एल.पी. चार्टर्ड अकाऊन्टंट, साई मंदिर रोड, भंडारा. ६) व्ही.ओ.के. ॲन्ड असोसिएटस्, शिवार्पण टॉवर, राजीव गांधी चौक, भंडारा.

असे एकूण ६ सी.ए. चे अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी मे. पिल्ला माथुर, मनुजा ॲन्ड कंपनी, सी.ए. १०२, पहिला माळा, मंगलम् श्रद्धा अपार्टमेंट, कमर्शियल विंग, गणेश पेठ, नागपूर यांची सेवा उत्तम प्रतीची आहे त्यामुळे मे. पिल्ला माथुर, मनुजा ॲन्ड कंपनी, सी.ए. १०२, पहिला माळा, मंगलम् श्रद्धा अपार्टमेंट, कमर्शियल विंग, गणेश पेठ, नागपूर यांची नियुक्ती करण्यात यावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार संस्थेतर्फे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात यावे असे ठरवून तसा ठराव पारित करण्यात आला.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ९ :- संचालक मंडळाच्या शिफारसीनुसार संस्थेची उपविधी नियम क्र. ड १.१ (१) (सभासदत्वासंबंधी पात्रता) दुरुस्ती करण्याबाबद निर्णय घेणे.

ठराव क्र. ९ :- उपरोक्त विषयाचे अनुषंगाने संचालक मंडळाच्या शिफारसीनुसार उपविधी नियम क्र. ड १.१ (१) (सभासदत्वासंबंधी पात्रता) दुरुस्ती करण्याबाबदचा प्रस्ताव आजच्या सभेत सादर करण्यात आला. त्यानुसार सुधारीत उपविधी अहवाल पेज क्र. ४१ सभासदत्वाची पात्रता प्रस्तावित केलेली आहे ती खालीलप्रमाणे-

सभासदत्वासंबंधी पात्रता :- कोणत्याही व्यक्तीस महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० कलम २२ प्रमाणे खालील अटींची पुर्तता केल्याशिवाय सभासद होता येणार नाही.

१) भंडारा व गोंदिया जि. प. किंवा शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या वर्ग ३ व ४ चा कर्मचारी असला पाहिजे व कायम असावा. तसेच जि. प. भंडारा व गोंदिया मध्ये रुजु झालेले व कार्यरत ग्रामसेवक व शिक्षण सेवक यांना संस्थेचे सभासद होता येईल. परंतु सदर कर्मचारी जि. प. च्या सेवेत कायम होईपर्यंत केवळ कायम कर्मचाऱ्यांच्या जामीनावरुन त्यांना कर्ज पुरवठा करता येईल.

सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करुन आजची सभा उपविधी नियम क्र. ड १.१ (१) ला सर्वानुमते मंजुरी प्रदान करते व मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना मंजुरीस्तव सादर करण्यात यावे. सदर प्रस्तावावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार संस्थेचे अध्यक्ष श्री. संजीव बावनकर व प्रधान व्यवस्थापक श्री. विलास फटे यांना संयुक्तरित्या प्रदान करण्यात येते व तसा ठराव सर्वानुमते पारित करण्यात येते.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : श्री. मुबारक सैय्यद, सभासद
अनुमोदक : श्री. सुधीर माकडे, सभासद

विषय क्र. १० :- संचालक मंडळाच्या शिफारसीनुसार सभासद कर्ज मर्यादा २५ लक्ष वरुन ४४ लक्ष करण्याकरीता उपविधी नियम क्र. फ १.१० (१), फ १.१० (३) (आकस्मिक कर्ज) ला ५० हजार वरुन ८० हजार रुपये करणेबाबद व फ १.१० (३) (१) ला दुरुस्ती करण्याबाबद निर्णय घेणे.

ठराव क्र. १० :- उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सद्यास्थितीत संस्थेची कर्ज मर्यादा रु. २५ लक्ष आहे. संस्थेची आर्थिक स्थिती व सभासदांची मागणी याचा विचार करुन आजच्या सभेत सभासद कर्ज मर्यादा रु. २५ लक्ष वरुन रु. ४४ लक्ष करण्यात यावे व आकस्मिक कर्ज मर्यादा ५० हजार वरुन ८० हजार करण्यात यावे असे प्रस्ताव संचालक मंडळाच्या शिफारसीनुसार आजच्या सभेत सादर करण्यात आले. अहवाल पेज क्र. ४१, ४२ व ४३ वर सदर उपविधी दुरुस्तीची सविस्तर माहिती दिलेली आहे ती खालीलप्रमाणे आहे.

* उपविधी दुरुस्ती *

उपविधी नियम क्र.	उपविधी सद्यास्थिती	दुरुस्ती नंतरची स्थिती	शेरा
फ१.१० (१)	कर्जविषयक धोरण :- संस्थेच्या प्रत्येक सभासदांना प्लॉट खरेदी, घरबांधणी, घरदुरुस्ती, स्थावर मिळकत खरेदी, मुला-मुलींचे लग्न, पाल्यांचे उच्च शिक्षण, परदेशातील उच्च शिक्षण, वैद्यकीय कारणास्तव, तसेच घरगुती साहित्य खरेदी इत्यादी कारणासाठी कर्ज देय राहील. संस्थेकडे उपलब्ध असलेले निधी सभासदांची पात्रता, शासकीय परिपत्रक लक्षात घेवून व्यवस्थापन समिती आपले कर्ज मर्यादा, कर्जावरील व्याजदर, कर्जफेडीचा निश्चित कालावधी निश्चित करेल. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे जा.क्र. पतसंस्था/स.आ.५/पगारदार/कर्म.पत/कर्ज मर्यादा/२०२०/०१, दि. ३१/१२/२०२० पगारदार सहकारी पतसंस्थांनी सभासदाला द्यावयाच्या कर्जामध्ये सभासदाचे वेतनमान, कर्जपरतफेड क्षमता, कर्जहप्ता आणि इतर वैधानिक कपाती (पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टप्रमाणे) याचा	कर्जविषयक धोरण :- संस्थेच्या प्रत्येक सभासदांना प्लॉट खरेदी, घरबांधणी, घरदुरुस्ती, स्थावर मिळकत खरेदी, मुला-मुलींचे लग्न, पाल्यांचे उच्च शिक्षण, परदेशातील उच्च शिक्षण, वैद्यकीय कारणास्तव, तसेच घरगुती साहित्य खरेदी इत्यादी कारणासाठी कर्ज देय राहील. त्यापैकी पाल्यांचे उच्च शिक्षण व परदेशातील उच्च शिक्षणासाठी दिलेले कर्ज शैक्षणिक कर्ज समजल्या जाईल व ते कर्ज एकूण कर्जाच्या मर्यादेत राहूनच दिले जाईल. संस्थेकडे उपलब्ध असलेले निधी सभासदांची पात्रता, शासकीय परिपत्रक लक्षात घेवून व्यवस्थापन समिती आपले कर्ज मर्यादा, कर्जावरील व्याजदर, कर्जफेडीचा निश्चित कालावधी निश्चित करेल. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे जा.क्र. पतसंस्था/स.आ.५/पगारदार/कर्म.पत/कर्ज मर्यादा/२०२०/०१, दि. ३१/१२/२०२० पगारदार सहकारी पतसंस्थांनी	संस्थेमधील ठेवी व भाग भांडवल वाढ झाल्यामुळे व सभासदाच्या गरजेनुसार वाढ करण्यात येत आहे.

	विचार करुन कर्जाचे मासिक हप्ते (मुद्दल व व्याजासह) कमाल २४० इतके राहतील. संस्थेचे कर्ज परतफेडीच्या हप्त्याची संख्या ठरवितांना सभासदांचा उर्वरीत कालावधी विचारात घ्यावा. सभासदाला द्यावयाचे कर्ज हे त्याच्या मासिक वेतनाच्या ३० पटीपेक्षा जास्त नसावे. सभासदांची वेतन मर्यादा विचारात घेवून खालीलप्रमाणे कमाल कर्ज मर्यादा राहील.			सभासदाला द्यावयाच्या कर्जामध्ये सभासदाचे वेतनमान, कर्जपरतफेड क्षमता, कर्जहप्ता आणि इतर वैधानिक कपाती (पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टप्रमाणे) याचा विचार करुन कर्जाचे मासिक हप्ते (मुद्दल व व्याजासह) कमाल २४० इतके राहतील. संस्थेचे कर्ज परतफेडीच्या हप्त्याची संख्या ठरवितांना सभासदांचा उर्वरीत कालावधी विचारात घ्यावा. सभासदाला द्यावयाचे कर्ज हे त्याच्या मासिक वेतनाच्या ३० पटीपेक्षा जास्त नसावे. सभासदांची वेतन मर्यादा विचारात घेवून खालीलप्रमाणे कमाल कर्ज मर्यादा राहील.		
	अ. क्र.	सभासद वेतन मर्यादा रुपये	एकूण कमाल कर्ज मर्यादा	अ. क्र.	सभासद वेतन मर्यादा रुपये	एकूण कमाल कर्ज मर्यादा	
	१	रु. १५,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. ५ लक्ष	१	रु. १५,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. ५ लक्ष	
	२	रु. १५,००१/- ते रु. २०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. ६ लक्ष	२	रु. १५,००१/- ते रु. २०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. ६ लक्ष	
	३	रु. २०,००१/- ते रु. २५,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी	रु. ७ लक्ष	३	रु. २०,००१/- ते रु. २५,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी	रु. ७ लक्ष	
	४	रु. २५,००१/- ते रु. ३०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. ८ लक्ष	४	रु. २५,००१/- ते रु. ३०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. ८ लक्ष	
	५	रु. ३०,००१/- ते रु. ३५,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. ९ लक्ष	५	रु. ३०,००१/- ते रु. ३५,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. ९ लक्ष	
	६	रु. ३५,००१/- ते रु. ४०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. १० लक्ष	६	रु. ३५,००१/- ते रु. ४०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. १० लक्ष	
	७	रु. ४०,००१/- ते रु. ४५,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. ११ लक्ष	७	रु. ४०,००१/- ते रु. ४५,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. ११ लक्ष	
	८	रु. ४५,००१/- ते रु. ५०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. १२ लक्ष	८	रु. ४५,००१/- ते रु. ५०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. १२ लक्ष	
	९	रु. ५०,००१/- ते रु. ६०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. १४ लक्ष	९	रु. ५०,००१/- ते रु. ६०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. १४ लक्ष	
	१०	रु. ६०,००१/- ते रु. ७०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. १६ लक्ष	१०	रु. ६०,००१/- ते रु. ७०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. १६ लक्ष	
	११	रु. ७०,००१/- ते रु. ८०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. १८ लक्ष	११	रु. ७०,००१/- ते रु. ८०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. १८ लक्ष	
	१२	रु. ८०,००१/- ते रु. ९०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. २० लक्ष	१२	रु. ८०,००१/- ते रु. ९०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. २० लक्ष	
	१३	रु. ९०,००१/- ते रु. १,००,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. २५ लक्ष	१३	रु. ९०,००१/- ते रु. १,००,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. २५ लक्ष	

				१४	रु. १,००,००१/- ते रु. १,२०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. ३० लक्ष	
				१५	रु. १,२०,००१/- ते रु. १,३०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. ३५ लक्ष	
				१६	रु. १,३०,००१/- ते रु. १,४०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. ४० लक्ष	
				१७	रु. १,४०,००१/- ते रु. १,५०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी.	रु. ४४ लक्ष	
फ १.१० ३	आकस्मिक कर्ज :- रु. ५०,०००/- पर्यंत आकस्मित कर्ज देता येईल. परतफेडीचे १२ हप्ते राहतील.			आकस्मिक कर्ज :- रु. ८०,०००/- पर्यंत आकस्मित कर्ज देता येईल. परतफेडीचे १२ हप्ते राहतील.			
फ१.१० ३ (१)	कर्जविषयक धोरण :- १) एकूण सर्व मिळून असणारे सर्वसाधारण कर्ज देय पगाराच्या ३० पटीपेक्षा जास्त रक्कमेचे किंवा रु. २५ लक्षपेक्षा जास्त असणार नाही. २) सभासदांना द्यावयाच्या कर्जामध्ये सभासदांचे एकूण मासिक ढोबळ वेतनमान, कर्ज परतफेडीची क्षमता आणि वेतन प्रदान कायदा १९३६ मधील कलम ७ (३) (एक) अन्वये नमुद केलेप्रमाणे सर्व प्रकारच्या वैधानिक, आयकर व अन्य वजावटी आणि पुर्वी मंजुर करण्यात आलेल्या कर्जाच्या व आता मंजुर करण्यात येणाऱ्या कर्जाच्या समान मासीक व्याज हप्त्यासह एकूण कपातीची रक्कम हे एकूण ढोबळ मासीक वेतनाच्या ७५% पेक्षा अधिक असता कामा नये. ३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ४९ अन्वये सभासदांच्या वेतनातून द्यावयाच्या कपाती बाबदचे संबंधीत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे किंवा आस्थापनेचे (Employer) प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील. अशी खात्री करुनच कर्ज द्यावे. २% रक्कम त्यांचे शेअर्स जमा करावी.			कर्जविषयक धोरण :- १) एकूण सर्व मिळून असणारे सर्वसाधारण कर्ज देय पगाराच्या ३० पटीपेक्षा जास्त रक्कमेचे किंवा रु. ४४ लक्षपेक्षा जास्त असणार नाही. २) सभासदांना द्यावयाच्या कर्जाममध्ये सभासदांचे एकूण मासिक ढोबळ वेतनमान, कर्ज परतफेडीची क्षमता आणि वेतन प्रदान कायदा १९३६ मधील कलम ७ (३) (एक) अन्वये नमुद केलेप्रमाणे सर्व प्रकारच्या वैधानिक, आयकर व अन्य वजावटी आणि पुर्वी मंजुर करण्यात आलेल्या कर्जाच्या व आता मंजुर करण्यात येणाऱ्या कर्जाच्या समान मासीक व्याज हप्त्यासह एकूण कपातीची रक्कम हे एकूण ढोबळ मासीक वेतनाच्या ७५% पेक्षा अधिक असता कामा नये. ३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ४९ अन्वये सभासदांच्या वेतनातून द्यावयाच्या कपाती बाबदचे संबंधीत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे किंवा आस्थापनेचे (Employer) प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील. अशी खात्री करुनच कर्ज द्यावे. २% रक्कम त्यांचे शेअर्स जमा करावी.	संस्थेमधील ठेवी व भाग भांडवल वाढ झाल्यामुळे व सभासदाच्या गरजेनुसार वाढ करण्यात येत आहे.

सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करुन आजची सभा उपविधी नियम क्र. फ १.१० (१), फ १.१० ३ (आकस्मिक कर्ज) व फ १.१० ३(१) सर्वानुमते मंजुरी प्रदान करते व मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना मंजुरीस्तव सादर करण्यात यावे. सदर प्रस्तावावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार संस्थेचे अध्यक्ष श्री. संजीव बावनकर व प्रधान व्यवस्थापक श्री. विलास फटे यांना संयुक्तरित्या प्रदान करण्यात येते व तसा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : श्री. विलास बोरकर, सभासद

अनुमोदक : श्री. जयंत तुरस्कर, सभासद

विषय क्र. ११ :- संचालक मंडळाच्या शिफारसीनुसार संस्थेची उपविधी नियम क्र. फ १.९ (२०) (व्यवस्थापन समितीचे कामे व जबाबदाऱ्या) ला दुरुस्ती करण्याबाबद निर्णय घेणे.

ठराव क्र. ११ :- उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संस्थेचा दैनंदिन व्यवहार सभासद संख्या, कर्ज वाटप यामध्ये दरवर्षी वाढ होत आहे. संस्थेचा वाढता व्याप व व्यवहारासोबत दैनंदिन कामकाज करत असतांना संस्थेला शाखा स्तरावर अडचणी सोडविण्याकरीता व शाखा स्तरावरचे नियोजन करण्याकरीता व संनियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने शाखा नियंत्रण समिती शाखा भंडारा, साकोली, गोंदिया व कोहमारा येथे स्थापन झालेल्या आहेत. त्याच आधारे पवनी व आमगांव शाखा नियंत्रण समिती तयार करण्यात यावे.

सदर उपविधी दुरुस्ती नियम क्र. फ १.९ (२०) (व्यवस्थापन समितीचे कामे व जबाबदाऱ्या) अहवाल पेज क्र. ४३, ४४ व ४५ वर मंजुरीकरीता सादर करण्यात आली आहे. त्यास मंजुरी प्रदान करावी अशी विनंती संस्थेचे अध्यक्ष यांनी सभेला केली.

त्यावर सविस्तर चर्चा करुन आजची सभा शाखा पवनी व आमगांव नियंत्रण समितीस मंजुरी प्रदान करते ते खालीलप्रमाणे असेल.

व्यवस्थापन समितीची कामे व जबाबदाऱ्या – विशेष कामाकरीता समित्या व उपसमित्या नेमणे आणि व्यवस्थापन समितीला योग्य वाटतील ते अधिकार त्यांना सुपूर्त करणे, त्यांनी केलेल्या सुचनांवर व्यवस्थापन समितीच्या सभेत निर्णय घेणे. त्यानुसार नियंत्रण समिती खालीलप्रमाणे असेल.

नियंत्रण समिती –

व्याख्या – नियंत्रण समिती म्हणजे संस्थेची उपसमिती आहे असे समजण्यात यावे. नियंत्रण समितीची रचना संस्थेच्या शाखानिहाय नियंत्रण समिती खालीलप्रमाणे राहील.

१)	शाखा भंडारा नियंत्रण समिती	:-	पं. स. भंडारा, मोहाडी, तुमसर, जि. प. भंडारा.
२)	शाखा साकोली नियंत्रण समिती	:-	पं. स. साकोली, लाखनी.
३)	शाखा गोंदिया नियंत्रण समिती	:-	पं. स. तिरोडा, गोंदिया, गोरेगांव, जि. प. गोंदिया.
४)	शाखा कोहमारा नियंत्रण समिती	:-	पं. स. देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी/मोरगांव
५)	शाखा पवनी नियंत्रण समिती	:-	पं. स. पवनी, लाखांदूर
६)	शाखा आमगांव नियंत्रण समिती	:-	पं. स. आमगांव, सालेकसा

शाखा नियंत्रण समिती सदस्य :-

त्या शाखेअंतर्गत पं. स. कार्यक्षेत्रामधून निवडून आलेले व त्या शाखेतील जिल्ह्याचे संचालक/संचालीका म्हणून निवडून आलेले संचालक सदर नियंत्रण समितीचे सदस्य असतील. शाखा नियंत्रण समिती किमान दोन संचालक असतील तरच समिती गठीत करण्यात येईल.

शाखा नियंत्रण समितीच्या अध्यक्षांची निवड :-

शाखा नियंत्रण समितीचे अध्यक्ष (शाखा अध्यक्ष) पदाच्या निवडणुकीकरीता निवडून आलेला नियंत्रण समितीच्या कार्यक्षेत्रातील कोणताही संचालक निवडणुक लढविण्यास पात्र राहतील.

शाखाध्यक्ष पदाची निवडणुक संस्थेचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली गुप्त मतदान पद्धतीने घेण्यात येईल. नियंत्रण समितीच्या अध्यक्षपदाची निवड संस्थेच्या कार्यकारीणी मंडळातून करण्यात येईल.

उद्देश :-

शाखेचे कार्य सुव्यवस्थितरित्या चालण्याकरीता व नियंत्रण ठेवण्याचे दृष्टीने सदर समिती स्थापना करण्यात आली आहे.

शाखा नियंत्रण समितीची कामे :-

१) शाखा स्तरावरील सभासदांच्या अडचणीचा विचार करुन त्या निवारण करण्याकरीता संचालक मंडळाच्या निर्णयानुसार अडीअडचणी सोडविणे.

२) शाखा स्तरावरील कर्मचाऱ्यावर नियंत्रण ठेवणे व संचालक मंडळाची घेतलेल्या निर्णयाची देखरेख ठेवणे, नियमबाह्य कृत्यास आड घालणे.

३) शाखा स्तरावरील सभासदांची कर्मचाऱ्यांबाबद तक्रार आल्यास चौकशी करणे व तसा अहवाल मुख्यालयाला सादर करणे.

४) शाखा स्तरावरील जमाखर्च मंजुर करणे व मंजुर खर्च मुख्यालय भंडारा येथे पाठविणे.

५) नियंत्रण समितीची सभा दर महिन्याचे १ ल्या आठवड्यात घेण्यात यावे.
६) नियंत्रण समितीने केलेल्या कामाचा अहवाल पुढील संचालक मंडळाच्या सभेत सादर करावा.
७) नियंत्रण समितीची नोटीस कार्यवृत्त लिहीण्याचे कामे व सभेत हजर राहणे शाखा स्तरावरील शाखाव्यवस्थापक करतील.
८) शाखा स्तरावरुन कर्ज प्रकरणे शिफारस करुन मुख्यालयाला पाठवतील व कर्ज प्रकरण मंजुर करण्याचे अधिकार मुख्यालयाला असतील.
९) नियंत्रण समितीच्या सभेची नोटीस नियंत्रण समिती अध्यक्षाचे परवानगीने ३ दिवस सभेच्या अगोदर शाखा व्यवस्थापक पाठवतील.
१०) नियंत्रण समितीच्या सभेतील विषय – शाखेचे जमाखर्च मंजुर करणे, सभासदाचे तक्रारीवर निर्णय घेणे, कर्मचाऱ्यांचा कामाचा आढावा घेणे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : श्री. अनिल गयगये, सभासद
अनुमोदक : श्री. विलास निखाडे, सभासद

विषय क्र. १२ :- कर्मचारी सेवानियम दुरुस्ती करण्याबाबद निर्णय घेणे.

ठराव क्र. १२ :- उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संस्थेत सद्यास्थितीत कार्यरत असलेले शाखा व्यवस्थापक, सहाय्यक लेखापाल, वसुली अधिकारी व वरिष्ठ सहाय्यक यांचे वेतन प्रस्तावित वेतन श्रेणीपेक्षा किंवा इतर संस्थेत देय असलेल्या वेतनापेक्षा जास्त असल्याने मा. अध्यक्ष यांनी कर्मचारी सेवानियम ८.१ मध्ये त्यात खालील सुधारणा प्रस्तावित केली.

* कर्मचारी सेवानियम *

सेवानियम क्र.	पदे	सध्यास्थिती	दुरुस्ती नंतरची स्थिती
८.१	ब–२ व्दितीय श्रेणी अधिकारी	वेतनश्रेणी :-	वेतनश्रेणी :-
	१) शाखा व्यवस्थापक	९३००–३४८००	५२००–२०२००
		ग्रेड पे ४२००	ग्रेड पे २८००
	२) सहाय्यक लेखापाल	५२००–२०२००	५२००–२०२००
		ग्रेड पे २४००, २५००	ग्रेड पे २८००
	३) वसुली अधिकारी	५२००–२०२००	५२००–२०२००
		ग्रेड पे २४००, २५००	ग्रेड पे २४००
	४) वरिष्ठ सहाय्यक	५२००–२०२००	५२००–२०२००
		ग्रेड पे २४००, २५००	ग्रेड पे २४००

टिप :– सदरील दुरुस्ती कार्यरत कर्मचाऱ्यांना लागु राहणार नाही. ०१ ऑक्टोबर २०२५ पासून पुढे लागु होणाऱ्या नवनियुक्त तसेच पदोन्नती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागु राहील अशी माहिती मा. अध्यक्ष यांनी सभेला दिली व प्रस्तावित कर्मचारी सेवानियम दुरुस्तीस मंजुरी प्रदान करावी अशी विनंती सभेला केली.

त्यावर सविस्तर चर्चा करुन आजची सभा कर्मचारी सेवानियम क्र. ८.१ ला मंजुरी प्रदान करते व तसा ठराव पारीत करते.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. १३ :- संस्थेच्या सुधारीत कर्मचारी आकृतीबंधास मंजुरी प्रदान करणे व लागु करणेबाबद निर्णय घेणे.

ठराव क्र. १३ :- उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष यांनी कर्मचारी सुधारीत आकृतीबंधाविषयी खालील माहिती सादर केली. संस्थेचे कार्यक्षेत्र भंडारा व गोंदिया जिल्हा आहे. संस्थेचे ०१ मुख्यालय व ०६ शाखा कार्यरत आहेत. संस्थेत विविध ठेवीच्या व कर्जाच्या योजना सर्व सभासदांना पोहचविणे, कामाचा व्याप व आर्थिक उलाढाल लक्षात घेता संस्थेत कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. यापूर्वीच्या कार्यकारी मंडळाने दिनांक २७/०८/२०१७ ला तिरोडा येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील विषय क्र. १३ नुसार शाखेकरीता कर्मचारी आकृतीबंध तयार करतांना प्रती पं. स. ०१ कनिष्ठ सहाय्यक, प्रती शाखा ०१ वरिष्ठ सहाय्यक, प्रती शाखा ०१ कॅशिअर, प्रती शाखा ०१ व्यवस्थापक व प्रती शाखा ०२ परिचराची पदे निर्माण करण्यासंबंधाने ठराव मंजुर झालेला होता. त्या ठरावानुसार पदे निर्माण करावयाची झाल्यास पवनी शाखेकरीता ०७ कर्मचारी व आमगांव शाखेकरीता ०७ कर्मचाऱ्यांची पदे निर्माण होतात. परंतु त्याप्रमाणे आकृतीबंध तयार करावयाचे झाल्यास पदाच्या संख्येत अधिक वाढ होईल ते न करता आस्थापना खर्च कमी करण्याच्या दृष्टीने आकृतीबंधात शाखेची पदे कमी करण्यात आली असून दोन्ही नवीन शाखेकरीता पाच–पाच कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करण्यात आली. सर्व जुन्या शाखांमधील कर्मचाऱ्यांची पदे कमी करण्यात आली. त्यामुळे १४ पदांच्या ऐवजी केवळ ०४ कर्मचाऱ्यांची पदे आकृतीबंधात नव्याने निर्माण करण्यात आली. त्यानुसार मा. अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे शाखानिहाय व मुख्यालयाचे आकृतीबंध प्रस्तावित केला.

नव्याने तयार करण्यात आलेले संस्था कर्मचारी स्टाफींग पॅटर्न (आकृतीबंध)

अ.क्र.	पदाचे नांव	एकूण मंजुर पदे	नव्याने प्रस्तावित पदे	शेरा
	अ) मुख्यालय भंडारा			
१	प्रधान व्यवस्थापक	०१	०१	
२	लेखापाल	०१	०१	
३	सहा. लेखापाल	०१	०१	
४	अंतर्गत तपासणीस	००	०१	+ ०१
५	वसुली अधिकारी	०१	०१	
६	वरिष्ठ सहाय्यक	०१	०१	
७	कनिष्ठ सहाय्यक/रोखपाल	०३	०३	
८	परिचर/चौकीदार	०२	०२	
	एकूण अ	१०	११	
	ब) शाखा भंडारा			
१	शाखा व्यवस्थापक	०१	०१	
२	वरिष्ठ सहाय्यक	०१	०१	
३	कनिष्ठ सहाय्यक/रोखपाल	०६	०५	- ०१
४	परिचर/चौकीदार	०२	०२	
	एकूण ब	१०	०९	
	क) शाखा साकोली			
१	शाखा व्यवस्थापक	०१	०१	
२	वरिष्ठ सहाय्यक	०१	०१	
३	कनिष्ठ सहाय्यक/रोखपाल	०५	०२	- ०३
४	परिचर/चौकीदार	०२	०१	- ०१
	एकूण क	०९	०५	
	ड) शाखा गोंदिया			
१	शाखा व्यवस्थापक	०१	०१	
२	वरिष्ठ सहाय्यक	०१	०१	
३	कनिष्ठ सहाय्यक/रोखपाल	०६	०५	- ०१
४	परिचर/चौकीदार	०३	०२	- ०१
	एकूण ड	११	०९	

		इ) शाखा कोहमारा		
१	शाखा व्यवस्थापक	०१	०१	
२	वरिष्ठ सहाय्यक	००	०१	+ ०१
३	कनिष्ठ सहाय्यक/रोखपाल	०३	०३	
४	परिचर/चौकीदार	०२	०१	- ०१
	एकूण इ	०६	०६	
		ई) शाखा पवनी		
१	शाखा व्यवस्थापक	००	०१	+ ०१
२	वरिष्ठ सहाय्यक	००	०१	+ ०१
३	कनिष्ठ सहाय्यक/रोखपाल	००	०२	+ ०२
४	परिचर/चौकीदार	००	०१	+ ०१
	एकूण ई	००	०५	
		फ) शाखा आमगांव		
१	शाखा व्यवस्थापक	००	०१	+ ०१
२	वरिष्ठ सहाय्यक	००	०१	+ ०१
३	कनिष्ठ सहाय्यक/रोखपाल	००	०२	+ ०२
४	परिचर/चौकीदार	००	०१	+ ०१
	एकूण फ	००	०५	
		गोषवारा		शैक्षणिक पात्रता
१	प्रधान व्यवस्थापक	०१	०१	एम.कॉम. G.D.C. & A, MS-CIT
२	लेखापाल	०१	०१	एम.कॉम. G.D.C. & A, MS-CIT
३	सहा. लेखापाल	०१	०१	बी.कॉम., MS-CIT
४	अंतर्गत तपासणीस	००	०१	कोणत्याही शाखेची पदवी, MS-CIT
५	शाखा व्यवस्थापक	०४	०६	कोणत्याही शाखेची पदवी, MS-CIT
६	वसुली अधिकारी	०१	०१	कोणत्याही शाखेची पदवी, MS-CIT
७	वरिष्ठ सहाय्यक	०४	०७	कोणत्याही शाखेची पदवी, MS-CIT
८	कनिष्ठ सहाय्यक/रोखपाल	२३	२२	कोणत्याही शाखेची पदवी, MS-CIT
९	परिचर/चौकीदार	११	१०	शालांत परीक्षा उत्तीर्ण
	एकूण पदे	४६	५०	

वरीलप्रमाणे आकृतीबंधाचा प्रस्ताव आजच्या सभेत सादर करण्यात आला व नवीन सुरु झालेल्या शाखा आमगांव व पवनी करीता मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने वाढीव आकृतीबंधानुसार कर्मचारी पद भरतीचा प्रस्ताव आजच्या सभेत सादर केला व त्यास मंजुरी प्रदान करावी अशी विनंती मा. अध्यक्ष यांनी सभेला केली.

त्यावर सविस्तर चर्चा करुन आजची सभा उपरोक्त ५० कर्मचाऱ्यांच्या सुधारीत कर्मचारी आकृतीबंधास मंजुरी प्रदान करते.

नवीन कर्मचारी आकृतीबंधानुसार निर्माण होणाऱ्या व पदोन्नतीने रिक्त कर्मचारी पदांची पदभरती करण्यास आजची सभा मंजुरी प्रदान करते व त्यानुसार आवश्यक प्रस्ताव तयार करुन मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना सादर करण्यात यावे. सदर प्रस्तावावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार संस्थेचे अध्यक्ष श्री. संजीव बावनकर व प्रधान व्यवस्थापक श्री. विलास फटे यांना प्रदान करण्यात येते असे सर्वानमुते ठरविण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. १४ :- सभासद ठेव २,०००/- वरुन २,५००/- करण्यास मंजुरी प्रदान करणे.

ठराव क्र. १४ :- उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सभासदांची मागणी व वाढत्या वेतनानुसार सभासद कर्ज मर्यादेमध्ये वाढ करण्यात आलेली आहे. सभासदांना सतत मागणी प्रमाणे कर्ज पुरवठा होण्याच्या दृष्टीने संस्थेला निधीची आवश्यकता असते.

सभासदांची वाढती कर्जाची मागणी व उपलब्ध निधीचा विचार करता सभासद ठेव २,०००/- वरुन २,५००/- रुपये करण्यात यावी अशी विनंती मा. अध्यक्ष यांनी सभेला केली.

त्यावर सविस्तर चर्चा करुन आजची सभा असा ठराव करते की, ०१ ऑक्टोबर २०२५ पासून सभासद ठेव रु. २,०००/- वरुन २,५००/- रुपये करण्यात यावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. १५ :- मृत्युफंड योजनेत सुधारणा करण्याबाबत निर्णय घेणे.

ठराव क्र. १५ :- उपरोक्त विषयान्वये संस्थेत मृत्युफंड योजना ही सभासदांच्या मृत्युपश्चात सभासदांच्या वारसदारांना आर्थिक आधार मिळविण्याच्या दृष्टीने संस्थेची आमसभा दिनांक ०२/०९/२०१२, ठराव क्र. ५ नुसार सुरुवात झालेली आहे. सभासदांची गरज व हित लक्षात घेता मा. अध्यक्ष यांनी मृत्युफंड योजनेमध्ये खालील सुधारणा प्रस्तावित केली.

सभासदांच्या मृत्युचे प्रमाण अधिक असल्याने सभासदांचे हित लक्षात घेता कर्ज माफीची अंतिम मर्यादा १४ लक्ष रुपयावरुन २० लक्ष रुपये करण्यात यावे तसेच कर्ज माफीची सुविधा सर्व सभासदांपर्यंत पोहचविण्याकरीता ज्या सभासदावर त्याच्या मृत्युपश्चात कर्ज शिल्लक असल्यास ज्या प्रमाणात कर्जाची वसुली येईल त्या प्रमाणात कर्ज माफी देवून मृत्युफंड योजनेचा लाभ देण्यात येईल अशी माहिती दिली.

वरीलप्रमाणे सविस्तर चर्चा करुन आजची सभा असा ठराव करते की, मृत्युफंड योजनेअंतर्गत संस्थेत कर्ज माफीची अंतिम मर्यादा २० लक्ष रुपये पर्यंत करण्यात येते. तसेच सभासदांच्या मृत्युनंतर सभासदांच्या कर्ज वसुलीच्या प्रमाणात कर्ज माफ करण्यात यावे असे ठरवून तसा ठराव पारित करण्यात आला.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. १६ :- सभासद शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमाबाबद.

ठराव क्र. १६ :- उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे यांच्या मार्फत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४ अ अन्वये सभासद सहकारी शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम आज दिनांक ३१/०८/२०२५ ला रोज रविवार दुपारी १.०० वाजता स्थळ लक्ष्मी-रमा सभागृह बाजार चौक, पवनी येथे आयोजित करण्यात आले. त्यात ५९३४ सभासद उपस्थित होते. त्यात सहकार कायद्याचे नियमाबाबतची माहिती सभासदांना देण्यात आली. संस्थेच्या ९७ व्या घटना दुरुस्तीमुळे दरवर्षी सभासद सहकारी शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम अनिवार्य करण्यात आलेले आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. १७ :- मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.

विषय क्र. १७ (१) :- सभासद कर्जावरील व्याजदर कमी करण्याबाबद निर्णय घेणे.

ठराव क्र. १७ (१) :- उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संस्थेचे सभासद श्री. मुबारक सैय्यद, श्री. सुधीर माकडे, श्री. अनिल गयगये, श्री. एस. यू. वंजारी, श्री. सचिन कुथे यांनी सध्या संस्था प्रगतीपथावर गेलेली आहे, त्यामुळे सभासदांच्या कर्जावरील व्याजदर १% कमी करण्यात यावा अशी आग्रही मागणी केली. त्यावर मा. अध्यक्ष यांनी संस्थेच्या सभासदांवर २९३ कोटी रुपयाचे कर्ज आहे. त्यावर जर १% व्याजदर कमी केल्यास अंदाजे २ कोटी ९३ लाख रुपये संस्थेला मिळणारे उत्पन्न कमी होईल हे संस्थेला परवडण्यासारखे नाही, परंतु आपली आग्रही मागणी लक्षात घेता भविष्यात यावर निर्णय घेण्यात येईल अशी माहिती दिली. त्यावर श्री. अनिल गयगये सभासद यांनी संपूर्ण आमसभेचा मागणीचा विचार होवून आजच योग्य निर्णय घ्यावा अशी मागणी केली. तर श्री. एन. डी. शिवरकर, श्री. डी. डी. दमाहे, सभासद यांनी ०.५०% व्याजदर कमी करावा अशी मागणी केली.

त्यावर मा. अध्यक्ष यांनी सभासदांची आग्रही मागणी लक्षात घेता सभासद कर्जावर ०.२५% व्याजदर कमी करण्यात येत आहे. मात्र सदर व्याजदर १ एप्रिल २०२६ पासून लागु करण्यात येईल असे जाहीर केले. त्यावर सभासदांनी टाळ्या वाजवून अध्यक्ष व संचालक महोदयांना धन्यवाद दिले व आभार मानले.

वरीलप्रमाणे सविस्तर चर्चा करुन आजची सभा असा ठराव करते की, सभासद कर्जावरील व्याजदर १ एप्रिल २०२६ पासून ०.२५% ने कमी करुन ८.७५% करण्यात येते. असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. १७ (२) :- आमसभा बैठक भत्ता वाढ करण्याबाबद.

ठराव क्र. १७ (२) :- उपरोक्त विषयान्वये संस्थेचे कार्यक्षेत्र भंडारा व गोंदिया जिल्हा आहे. वाढती महागाई लक्षात घेता सभासदांना आमसभेला उपस्थित राहण्याकरीता ७००/- रु. अपूरे पडतात. त्यामुळे १,०००/- रु. बैठक भत्ता करण्यात यावे अशी मागणी श्री. मुबारक सैय्यद, सभासद यांनी केली तर श्री. संदिप तिडके, सभासद यांनी सर्व सभासदांना २,०००/- रु. बैठक भत्ता लागु करण्यात यावा अशी मागणी केली.

त्यावर अध्यक्ष यांनी सभासदांच्या मागणीचा सकारात्मक विचार करुन आमसभा बैठक भत्ता ७००/- रु. वरुन ८००/- रु. करण्यात येत आहे व आजच्या सभेला सुद्धा लागु करण्यात येत आहे असे जाहिर केले.

वरीलप्रमाणे सविस्तर चर्चा करुन आमसभा बैठक भत्ता ७००/- रु. वरुन ८००/- रु. करण्यास आजची सभा मंजुरी प्रदान करते असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. १७ (३) :- संस्थेत कर्मचारी भरती करण्याबाबद.

ठराव क्र. १७ (३) :- उपरोक्त विषयान्वये श्री. उमेश गायधने, सभासद यांनी नवीन शाखेकरीता कर्मचारी आकृतीबंधानुसार कर्मचारी भरती करणार आहात काय ? असा प्रश्न केला. त्यावर अध्यक्ष यांनी संस्थेचा वाढता आर्थिक व्यवहार व कामाचा व्याप लक्षात घेता मनुष्यबळाची गरज भासल्यास कर्मचारी भरती करावी लागेल. नवीन कर्मचारी आकृतीबंधानुसार निर्माण होणाऱ्या व पदोन्नतीने रिक्त होणाऱ्या कर्मचारी पदाचीच पदभरती करण्यात येईल. परंतु मंजुर कर्मचारी आकृतीबंधाच्या बाहेर जावून कर्मचारी भरती घेण्यात येणार नाही असे सभेला आस्वस्त केले व प्रश्नकर्त्या सभासदांचे समाधान केले.

वरीलप्रमाणे सविस्तर चर्चा करुन आजची सभा असा ठराव करते की, संस्थेत नवीन कर्मचारी आकृतीबंधाच्या प्रमाणे कर्मचारी भरती करण्यात यावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. १७ (४) :- **DCPS** आधार योजनेबाबद निर्णय घेणे.

ठराव क्र. १७ (४) :- उपरोक्त विषयान्वये श्री. फारुख शाह, सभासद यांनी **DCPS** आधार योजनेविषयी संस्थेव्दारे देण्यात येत असलेले १ लाख रुपये मदत देत असल्याबाबत संचालक मंडळाला धन्यवाद दिले. मात्र सदर रक्कम ही पुरेशी नसल्याने ती रक्कम किमान २ लक्ष रुपये करण्यात यावी अशी मागणी केली. त्याला सुधीर माकडे सभासद यांनी अनुमोदन दिले.

त्यावर मा. अध्यक्ष यांनी सध्या देण्यात येत असलेली १ लक्ष रुपये आर्थिक सांत्वना मदत पुरेशी आहे अशी माहिती दिली.

वरीलप्रमाणे सविस्तर चर्चा करुन आजची सभा **DCPS** आधार योजनेअंतर्गत मृत सभासदांच्या वारसदारास १ लक्ष रुपये मदत देण्यात यावी असे ठरवून तसा ठराव पारीत करण्यात आला.

ठराव सर्वानुमते मंजूर.

यापुढे इतर विषय न आल्यामुळे मा. अध्यक्ष यांनी आजची सभा सुरळीत चालविण्यास सहकार्य दिल्याबद्दल सर्व सभासदांचे आभार मानून वंदेमातरम् नंतर सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वा/-
विलास फटे
प्रधान व्यवस्थापक

स्वा/-
संजीव बावनकर
अध्यक्ष

नमुना "एन -२"

लेखापरिक्षकाचा अहवाल

(कलम (८१ आणि नियम ६३ (३))

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव,
जिल्हा परिषद व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.,
भंडारा. रजि. नं.११५

विषय :- नेमणूक संदर्भ विषय क्र.०८ व ठराव क्र. ०८ दि. ३१/०८/२०२५ वैधानिक लेखापरिक्षक म्हणून आर्थिक विवरणाचा अहवाल.

१) आम्ही,**जिल्हा परिषद व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.भंडारा. रजि. नं. ११५** या संस्थेच्या दि.०१.०४.२०२५ ते दि.३१.०३.२०२६ या कालावधीचे लेखापरिक्षण केलेले असून, त्यामध्ये आर्थिक विवरणपत्रकांचे लेखापरिक्षण केले असून,त्यामध्ये दि.३१.०३.२०२६ अखेरचे ताळेबंदपत्रक व सदर वर्षाचे नफा व तोटा पत्रक आणि लेखा धोरणाचा अर्थपूर्ण सारांश आणि संस्थेच्या शाखाच्या आर्थिक पत्रकासह अन्य स्पष्टीकरणात्मक माहिती नमूद केलेली आहे.

२) **व्यवस्थापनाची अधिक विवरणपत्राची जबाबदारी**
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्याखाली नियमान्वये आर्थिक विवरणपत्र तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये फसवणूकी किंवा त्रुटीमुळे,भौतिक चुकीच्या गोष्टीपासून मुक्त असलेल्या आर्थिक विवरण पत्रकांच्या तयारीशी संबधित अंतर्गत नियंत्रणाची रचना,अंमलबजावणी आणि देखभाल यांचा समावेश आहे.

३) **लेखापरिक्षकाची जबाबदारी** :-
आम्ही केलेल्या लेखापरिक्षणावर आधारे,या आर्थिक पत्रकांवर मत व्यक्त करण्याची जवाबदारी आमची आहे. दि इस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंटस ऑफ इंडिया यांचे व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमानुसार लागू असले असलेल्या लेखांकन मानका नुसार आम्ही सदरचे लेखापरिक्षण केलेल आहे.ज्या मानांकनानूसार नैतिक आवश्यकता व नियोजनाचे पालन करून,आर्थिक पत्रके भौतिक चुकांपासून मुक्त आहे की नाहीत,या बदल वाजवी आश्वासन प्राप्त करण्यासाठी लेखापरिक्षण केलेले आहे.

४) आर्थिक पत्रकातील रकमा व प्रकटीकरणांबदल ऑडिट पुरावे मिळविण्यासाठी,लेखापरिक्षणा मध्ये कामगिरी क्रियेची (Performing Procedure) समावेश केलेला आहे.सदर प्रक्रिया निवडीची बाब लेखापरिक्षकाच्या निर्णयावर अवलंबून असून,त्यामध्ये फसवणुकीमूळे किंवा त्रुटीमुळे,भौतिक चुंका बाबतच्या आर्थिक विवरण पत्रकातील जोखीम निर्धारित करण्याच्या पध्दतीचा समावेश आहे.अशा जोखीम निर्धारित करण्यासाठी,योग्य त्या परिस्थितील लेखापरिक्षण प्रक्रियसाठी,संस्थेने तयार केलेले आर्थिक पत्रके आणि रास्त सादरीकरण हा अंतर्गत नियत्रंणाशी संबंधित असल्याची बाब लेखापरिक्षकाने विचारत घेतलेली आहे.लेखापरिक्षणात,अवलंबिलेल्या लेखा धोरणांच्या योग्यतेचे मूल्यांकन करणे आणि व्यवस्थापनाद्वारे केलेल्या लेखा अंदाजांचे वाजवीपणा तसेच आर्थिक पत्रकांच्या एकूण सादरीकरणाचे मूल्यांकन करण्याचाही समावेश आहे.

ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीस आल्याप्रमाण संस्थेच्या आधकारात करण्यात आल आहत.

क) या लेखा परिक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडुन आलेली विवरणपत्रे योग्य आहेत.

८. आमचे अभिप्रानुसार ताळेबंद पत्रक आणि नफा व तोटा हिषोब यांचे संस्थेला लागु असलेल्या लेखांकन मानांकनापैकी (अकौंटींग स्टॅन्डर्स्) संस्थेने लेखांकन मानांकने यांचे अनुपालन केले नाही/आहे. याचा तक्ता सोबत जोडला आहे.

९. आम्ही आणखी पुढील अहवाल सादर करतो–

१. या अहवालासंदर्भात ताळेबंद पत्रक आणि नफा व तोटा तसेच खर्चाचा हिशोब हे हिशोबाची पुस्तके आणि विवरणपत्रे यांचा योग्य मेळ बसतो आहे.

२. आम्ही पुस्तकांची तपासनी केल्यानंतर संस्थेने योग्य ती ताळेबंद पत्रके जी अधिनियमानुसार जरूरीची आहेत, ती सर्व व्यवस्थीत आहेत.

३. लेखापरिक्षण अहवाल कालावधीत संस्थेच्या शाखा त्यांचा लेखापरीक्षण अहवाल नाहित. त्यामुळे सोबत जोडला नाही.

४. संस्थेस चालू तपासनी कालावधीसाठी ऑडीट वर्ग **"अ"** मिळाला आहे.

K Kerbarkar

(सौ.के.एन.केरझरकर)
लेखापरिक्षक श्रेणी–२
सहकारी संस्था,(जकांस)भंडारा

स्थळ :–भंडारा

दिनांक :– २४/०७/२०२६

(३) शाखाच्या लखापारक्षकाना लखापारक्षण कलल्या शाखाच लखापारक्षण अहवाल, सदर लेखापरिक्षण अहवाल तयार करताना आम्हांस आवश्यक असणा-या पध्दतीनुसार विचारात घेण्यात आलेले आहेत.

(४) संस्थेस सन २०२५-२०२६ या वर्षाच्या लेखापरिक्षणासाठी "अ" लेखापरिक्षण वर्ग प्रदान करण्यात आलेला आहे.

ठिकाण :- नागपूर

दिनांक :- ०१/०७/२०२६

Pilla Mathur Manuja & Co. Chartered Accounts NAGPUR

पिल्ला माथुर मनुजा ॲंड कंपनी
सनदी लेखापाल

सी.ए. रजत आर शाहु
भागीदार
मे.न.१७४६३०

UDIN: 26174630WZJEUO8029

(आकडेवारी लाखात)

अं क.	तपशील	चालु आर्थिक वर्ष	मागील आर्थिक वर्ष
१	**भाडवल पर्याप्तता**		
अ	स्वनिधी रक्कम	2781.03	2570.32
ब	जोखीम भारांकन रक्कम	9688	11197.09
क	भाडवल पर्याप्तता (CRAR) शेकडा प्रमाण %	28.70	22.95
2	**सी.आर.आर. प्रमाण %**	0.87	2.18
3	**स्वनिधी रक्कम हालचाल**		
अ	आरंभिची शिल्लक - रक्कम	2570.33	2398.12
ब	अधिक - या आर्थिक वर्षातील वाढ रक्कम	210.71	172.21
क	वजा -या आर्थिक वर्षातील उचल रक्कम	0	0
ड	अखेर शिल्लक रक्कम	2781.04	2570.33
४	**गुंतवणुक**		
अ	एस.एल.आर.गुंतवणुक	5844.24	4136.39
ब	नॉन एस.एल.आर.गुंतवणुक रक्कम	20.73	20.74
क	जिल्हा/राज्य बँक भाग गुंतवणुक रक्कम	75.00	75.00
ड	अनुत्पादक गुंतवणुक रक्कम	1.02	1.01
इ	अनुत्पादक गुंतवणुक घसारा तरतुद रक्कम	0	0
5	**एस.एल.आर.प्रमाण %**	16.14	13.17
6	**अनुत्पादक कर्जे**		
अ	निव्वळ एन.पी.ए शेकडा प्रमाण %	1.43	1.14
ब	ठोबळ एन.पी.ए. शेकडा प्रमाण %	1.52	1.22
क	निव्वळ एन.पी.ए रक्कम	470.60	342.52
ड	दुरयम कर्जे (सब-स्टॅडर्ड) एकुण येणे रक्कम	382.78	325.85
इ	संशयित-१ कर्ज (डी.१) एकुण येणे रक्कम	0	13.04
ई	संशयित-२ कर्ज (डी.२) एकुण येणे रक्कम	22.62	3.61
फ	संशयित-३ कर्ज (डी.३) एकुण येणे रक्कम	0	0
ग	बुडीत कर्जे (लॉस) एकुण येणे रक्कम	0	0
घ	ठोबळ एन.पी.ए.एकुण येणे रक्कम	405.40	342.50
७	**तारणी/विनातारणी ठोबल एन.पी.ए प्रमाण :**		
अ	ठोबळ एन.पी.ए मधील तारणी रक्कम शेकडा प्रमाण %	1.52	1.22
ब	ठोबळ एन.पी.ए मधील विनातारणी रक्कम शेकडा प्रमाण %	0	0
८	**अनुत्पादक कर्जे व गुंतवणुक वगळुन इतर मालमत्ता एन.पी.ए तरतुद रक्कम**	0	0
९	**तारणी/विनातारणी कर्ज प्रमाण :**		
अ	तारणी कर्ज रक्कम शेकडा प्रमाण :	100	100
ब	विनातारणी कर्ज प्रमाण :		
10	**निव्वळ नफ्यातुन केलेली नियम ४९ (अ) मधील नमुद खर्च तरतुद रक्कम**	2949.06	2506.71
११	**अपहार/गैरव्यवहार रक्कम हालचाल**		
	आरंभिची शिल्लक रक्कम	0	0
	अधिक - या आर्थिक वर्षातील वाढ रक्कम	0	0
	वजा - या आर्थिक वर्षातील वसुली रक्कम	0	0
	अखेर शिल्लक रक्कम	0	0
12	**सरासरी ठेव व्याज खर्च शेकडा प्रमाण %**	8.00	8.00
13	**सरासरी कर्ज व्याज उत्पन्न शेकडा प्रमाण %**	8.50	8.50
14	**सरासरी गुंतवणुक व्याज उत्पन्न शेकडा प्रमाण %**	9.00	9.00
१५	**नॉन बँकिंग असेट (एनबीए)**		
v	एकुण येणे रक्कम	0	0
c	या पोटीची स्वतंत्र एकुण तरतुद रक्कम	0	0
१६	**जोखीम केंद्रीकरण शेकडा प्रमाण**		
v	एकुण ठेवीमध्ये सर्वात मोठ्या वीस ठेवीदारांच्या ठेव रकमेची टक्केवारी %	1.94	2.31
c	एकुण कर्जामध्ये सर्वात मोठ्या वीस कर्जदारांच्या कर्ज रकमेची टक्केवारी %	1.82	1.56
d	बँकेच्या एकुण ठोबळ एन.पी.ए.मध्ये सर्वात मोठ्या वीस एनपीएकर्जदार यांचे ठोबळ एनपीएरकमेची टक्केवारी	0	0
		0	0
17	**परिचलन (ऑपरेटिंग) नफ्याचे सरासरी खेळत्या भांडवलाची शेकडा प्रमाण %**	0.21	0.25
18	**निव्वळ नफ्याचे सरासरी खेळत्या भांडवलाची शेकडा प्रमाण %**	0.67	0.71
19	**सी.डी.रेशो प्रमाण %**	86.8	90.86
20	**प्रशासकिय व आस्थापना खर्चाचे खेळते भांडवलाची प्रमाण %**	0.80	0.84

FOR,PILLA MATHUR MANUJA & CO.,
CHARTERED ACCOUNTANTS
CA RAJAT R SHAHU
PARTNER

प्रधान व्यवस्थापक
जि.प. व शासकीय कर्मचारी सहकारी
पत संस्था मर्या. भंडारा. र.नं. ११५

जि. प. व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. भंडारा. र. नं. ११५

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात मृत्युफंड योजनेअंतर्गत कर्ज माफ झालेल्या सभासदांची यादी

	शाखा भंडारा	मृत्युफंड रक्कम
१)	स्व.श्री. विजयकुमार एकनाथ मेश्राम, क.प्र.अ., लघु पाटबंधारे विभाग, जि. प. भंडारा.	रु. ३,२९,६८६.00
२)	स्व.श्री. भाष्कर माणिकराव डोमळे, ग्रा.से., पंचायत विभाग, पं. स. तुमसर.	रु. ७,१७,६२७.00
३)	स्व.कु. माया प्यारेलाल हिरापुरे, ग्रा.से., पंचायत विभाग, पं. स. तुमसर.	रु. १२,२२,८७७.00
४)	स्व.श्री. सुधाकर गंगाराम आगलावे, व. सहा., कृषी विभाग, जि. प. भंडारा.	रु. २,५५,९९४.00

	शाखा गोंदिया	मृत्युफंड रक्कम
१)	स्व.श्री. अशोक भिकराम चव्हाण, परिचर, आरोग्य विभाग, जि. प. गोंदिया.	रु. २१,१९३.00
२)	स्व.श्री. रिशीकांत बी. रामटेके, क. सहा., जि. प. हायस्कूल गोरेगांव, पं. स. गोरेगांव.	रु. ४,७१,३८५.00

	शाखा साकोली	मृत्युफंड रक्कम
१)	स्व.श्री. मनोज मोतीलाल मेश्राम, स.शि., जि. प. प्राथ. शाळा उमरी, पं. स. साकोली	रु. १४,00,000.00
२)	स्व.श्री. धर्मराज गणपत उईके, क.सहा., जि. प. हायस्कूल पिंपळगांव, पं. स. लाखनी	रु. ९,२0,८९९.00

	शाखा कोहमारा	मृत्युफंड रक्कम
१)	स्व.श्री. नामदेव दामाजी धुर्वे, ग्रा.से., पंचायत विभाग, पं. स. देवरी	रु. ८,९८,१५५.00

	शाखा पवनी	मृत्युफंड रक्कम
१)	स्व.श्री. कृष्णकुमार सोमनाथ चौधरी, परिचर, पशुधन विभाग, पं. स. लाखांदूर	रु. ५,७२,६२८.00

मृत्युफंड (कर्ज निरंक असणारे सभासद २,00,000/- रु. देय यादी)

	शाखा भंडारा	मृत्युफंड रक्कम
१)	स्व.श्री. योगेंद्र महादेव मंडपे, स.शि., जि. प. प्राथ. शाळा सोनेगांव, पं. स. तुमसर	रु. २,00,000.00

	शाखा गोंदिया	मृत्युफंड रक्कम
१)	स्व.श्री. संजय नारायण खोटेले, वा.चा., यांत्रिकी उपविभाग, जि. प. गोंदिया.	रु. २,00,000.00
२)	स्व.श्री. श्रीनिवास आर. बुलगमवार, स. शि., जि. प. प्राथ. शाळा सितेपार, पं.स.तिरोडा	रु. २,00,000.00
३)	स्व.श्री. रंजन भैय्यालाल नेवारे, ग्रामसेवक, पंचायत विभाग, पं. स. गोरेगांव	रु. २,00,000.00

	शाखा कोहमारा	मृत्युफंड रक्कम
१)	स्व.श्री. तुळशिराम परसराम नरेटी, स.शि., जि. प. प्राथमिक शाळा शिरपुरबांध, पं. स. देवरी	रु. २,00,000.00
२)	स्व.श्री. संजय हरी पंचभाई, स.शि., जि. प. प्राथ. शाळा चांदलमेटा, पं. स. देवरी	रु. २,00,000.00
३)	स्व.श्रीमती माया शंकर शहारे, स.शि., जि. प. प्राथ. शाळा किसानपूर, पं. स. सडक/अर्जुनी	रु. २,00,000.00

	शाखा आमगांव	मृत्युफंड रक्कम
१)	स्व.श्री. केशवराव फागुजी बहेकार, स.शि., जि. प. प्राथ. शाळा पाटीलटोला, पं. स. आमगांव	रु. २,00,000.00

D.C.P.S. योजने अंतर्गत दिलेले लाभ

	शाखा भंडारा	*D.C.P.S.* रक्कम
१)	स्व.श्री. गोविंद मुंगाजी आव्हाड, स.शि., जि. प. प्राथ. शाळा मोहगांव/करडी, पं. स. मोहाडी.	रु. १,००,०००.००

	शाखा कोहमारा	*D.C.P.S.* रक्कम
१)	स्व.श्री. आनंदराव गणपत उके, क.सहा., आरोग्य विभाग, पं. स. सडक/अर्जुनी	रु. १,००,०००.००
२)	स्व.श्री. नामदेव दामाजी धुर्वे, ग्रा.से., पंचायत विभाग, पं. स. देवरी	रु. १,००,०००.००
३)	स्व.श्रीमती माया शंकर शहारे, स.शि., जि. प. प्राथमिक शाळा किसानपूर, पं. स. सडक/अ.	रु. १,००,०००.००
४)	स्व.श्री. संजय हरी पंचभाई, स.शि., जि. प. प्राथमिक शाळा चांदलमेटा, पं. स. देवरी	रु. १,००,०००.००
५)	स्व.श्री. गजानन उत्तमराव ठाकरे, स.शि., जि. प. हाय. अर्जुनी/मोर, पं. स. अर्जुनी/मोर.	रु. १,००,०००.००

	शाखा आमगांव	*D.C.P.S.* रक्कम
१)	स्व.श्री. केशवराव फागुजी बहेकार, स.शि., जि. प. प्राथ. शाळा पाटीलटोला, पं. स. आमगांव	रु. १,००,०००.००

कल्याण निधी योजने अंतर्गत मृत सभासदांना दिलेले लाभ

	शाखा भंडारा	कल्याण निधी रक्कम
१)	स्व.श्री. योगेंद्र महादेव मंडपे, स.शि., जि. प. प्राथ. शाळा सोनगाव, पं. स. तुमसर	रु. २०,०००.००
२)	स्व.कु. माया प्यारेलाल हिरापुरे, ग्रा.से., पंचायत विभाग, पं. स. तुमसर	रु. २०,०००.००
३)	स्व.श्री. रंजीत पांडुरंग मेश्राम, ग्रा.से., पंचासत विभाग, पं. स. तुमसर	रु. २०,०००.००
४)	स्व.श्री. सिराज खाँ पठान, वा.चा., सामान्य प्रशासन विभाग, जि. प. भंडारा	रु. २०,०००.००
५)	स्व.श्री. सुधाकर गंगाराम आगलावे, व.सहा., कृषी विभाग, जि. प. भंडारा	रु. २०,०००.००
६)	स्व.श्री. घनश्याम अंताराम मलेवार, क.सहा., शिक्षण विभाग, पं. स. मोहाडी	रु. २०,०००.००
७)	स्व.श्री. राधेश्याम कवळूजी केवट, क.सहा., आस्थापना विभाग, पं. स. मोहाडी	रु. २०,०००.००
८)	स्व.श्री. शिवपाल तुकाराम भाजीपाले, वि.अधि., आस्थापना विभाग, पं. स. मोहाडी	रु. २०,०००.००
९)	स्व.श्री. आशिष मनोहरजी वनवे, क. सहा., आस्थापना विभाग, पं. स. तुमसर	रु. २०,०००.००

	शाखा गोंदिया	कल्याण निधी रक्कम
१)	स्व.श्री. श्रीनिवास एन. बुलगमवार, स.शि., जि. प. प्राथ. शाळा सितेपार, पं. स. तिरोडा	रु. २०,०००.००
२)	स्व.श्री. नजीर हुसैन सफदर हुसैन शेख, स.शि., जि. प. प्राथ. शाळा माकडी, पं. स. गोंदिया	रु. २०,०००.००
३)	स्व.श्री. महिपाल रामा पारधी, स.शि., जि. प. प्राथ. शाळा खमारी, पं. स. तिरोडा	रु. २०,०००.००
४)	स्व.श्री. विलास टी. बुरले, परिचर, प्राथ. आरोग्य केंद्र चोपा, पं. स. गोरेगांव	रु. २०,०००.००
५)	स्व.श्री. राकेश मंगल बिसेन, क.सहा., वित्त विभाग, जि. प. गोंदिया	रु. २०,०००.००
६)	स्व.श्री. सचिन रमेश शेंडे, क.सहा., जि. प. हायस्कूल गोरेगांव, पं. स. गोरेगांव	रु. २०,०००.००

	शाखा साकोली	कल्याण निधी रक्कम
१)	स्व.श्री. सुरेश श्रीराम बडगे, क.सहा., आस्थापना विभाग, पं. स. लाखनी.	रु. २०,०००.००

	शाखा कोहमारा	कल्याण निधी रक्कम
१)	स्व.श्री. कुंभराव बळीराम नेवारे, स.शि., जि. प. प्राथ. शाळा बोपाबोडी, प.सं.सडक/अर्जुनी	रु. २०,०००.००
२)	स्व.श्री. गजानन उत्तमराव ठाकरे, स.शि., जि. प. हाय. अर्जुनी/मोर., पं. स. अर्जुनी/मोर.	रु. २०,०००.००
३)	स्व.श्री. सुरजलाल श्रीराम साखरे, स.शि., जि. प. प्राथ. शाळा मुरपार, प. सं. सडक/अर्जुनी	रु. २०,०००.००
४)	स्व.श्री. लिलाधर विठ्ठल गेडाम, स.शि., जि. प. प्राथ. शाळा पिंडकेपार, पं. स. देवरी	रु. २०,०००.००
५)	स्व.श्री. भगवान नारायण मेश्राम, स.शि., जि. प. प्राथ. शाळा निमगांव, पं. स. अर्जुनी/मोर.	रु. २०,०००.००
६)	स्व.श्री. रामकृष्ण हरिशचंद्र चौरागडे, स.शि., जि. प. प्राथ. शाळा डव्वा, पं. स. सडक/अर्जुनी	रु. २०,०००.००
७)	स्व.श्री. देवानंद पंढरी टेंभुर्णे, आ.सहा., तालुका आरोग्य विभाग, पं. स. सडक/अर्जुनी	रु. २०,०००.००
८)	स्व.श्री. श्रीकृष्ण बाबुराव ठाकरे, स.शि., जि. प. प्राथ. शाळा कोकणा, पं. स. सडक/अर्जुनी	रु. २०,०००.००
९)	स्व.श्री. नितीन सुरेश गोस्वामी, स.शि., जि. प. प्राथ. शाळा झुरकुटोला, पं. स. सडक/अर्जुनी	रु. २०,०००.००

	शाखा पवनी	कल्याण निधी रक्कम
१)	स्व.श्री. प्रदिप तुलाराम गेडाम, क.सहा., लघुपाटबंधारे उपविभाग, प.सं.पवनी	रु. २०,०००.००

जिल्हा परिषद व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. भंडारा.

कर्मचारी

मुख्यालय भंडारा
विदर्भ हाऊसिंग बोर्ड कॉलनी, जिल्हा परिषद चौक, भंडारा.

श्री. विलास ए. फटे	प्रधान व्यवस्थापक	मो. ८६९८०५०७६२
श्री. पराग ई. आदमने	लेखापाल	मो. ७५८८७७०८९८
श्री. सुरज बी. खराबे	सहाय्यक लेखापाल	मो. ९४०३०३७८५८
श्री. रोहित के. साठवणे	अंतर्गत तपासणीस	मो. ९०२८४४२८५७
कु. संध्या के. कुथे	वसुली अधिकारी	मो. ९४०४०१४६८३
श्री. विनायक एस. मोहनकर	वरिष्ठ सहाय्यक	मो. ९८८१६७४३२३
कु. वैशाली आर. मारवाडे	वरिष्ठ सहाय्यक	मो. ७७९८१४४५३६
श्री. गिरीश जी. कारेमोरे	कनिष्ठ सहाय्यक	मो. ९९६००१७९३७
श्रीमती सुषमा एन. काळे	कनिष्ठ सहाय्यक	मो. ७०२८०३६०१८
श्री. सिताराम एन. सोनकुसरे	परिचर	मो. ९४२०८६६५३१
श्री. कुणाल एफ. कांबळे	परिचर	मो. ७२७६६२६६५०

शाखा भंडारा
विदर्भ हाऊसिंग बोर्ड कॉलनी, जिल्हा परिषद चौक, भंडारा.

श्री. संतोष एस. बिसने	शाखा व्यवस्थापक	मो. ९४२३५१४४८८
श्री. मोहीत व्ही. अंबुले	वरिष्ठ सहाय्यक	मो. ९४०३१३१४०८
श्रीमती रजनी एच. राऊत	कनिष्ठ सहाय्यक	मो. ९०४९१२७४६५
श्री. अभिजीत आर. नागपूरे	कनिष्ठ सहाय्यक	मो. ७७६७०६१६५७
श्री. सुमित एम. खराबे	कनिष्ठ सहाय्यक	मो. ८६६८५४८५३६
श्रीमती प्रिती डी. राऊत	कनिष्ठ सहाय्यक	मो. ९९६०२७२९६४
श्री. सिद्धांत एस. घावळे	कनिष्ठ सहाय्यक	मो. ९३७०८६२४५७
श्री. मकरंद बी. जोशी	परिचर	मो. ९४२१९३६९२९
श्री. हिरेन्द्र डी. गजभिये	परिचर	मो. ९५४५३२४३४९

शाखा गोंदिया
नविन आर.टी.ओ. ऑफिसच्या बाजूला, फुलचूर पेठ, गोंदिया.

श्री. रविशंकर टी. रंगारी	शाखा व्यवस्थापक	मो. ८२७५३९८६५७
श्री. योगेश पी. मोहोड	कनिष्ठ सहाय्यक	मो. ८९८३६८६४०४
श्री. विनय ए. ठाकरे	कनिष्ठ सहाय्यक	मो. ८७८८९५८३४१
श्री. अनंता पी. पारधी	कनिष्ठ सहाय्यक	मो. ७९७२०५९०८१
श्री. पंकज आर. मडकाम	कनिष्ठ सहाय्यक	मो. ८२०८२२०४१८
श्री. संगम एस. बिसेन	कनिष्ठ सहाय्यक	मो. ८५५४९०६१५७
श्री. नितीन डी. पटले	कनिष्ठ सहाय्यक	मो. ८२०८१५१०३९
श्री. दिक्षीत बी. रामटेके	परिचर	मो. ९४०५९८६८३९

शाखा साकोली
सिव्हील वार्ड क्र. ०६, ग्रामीण रूग्णालयाच्या मागे, एस.बी.आय. (ए.डी.बी.) बँक जवळ, साकोली.

श्री. गुलाब एन. भुरे	शाखा व्यवस्थापक	मो. ९४२२८३२९८८
श्री. समर्थ ए. बडगे	वरिष्ठ सहाय्यक	मो. ८२७५३९८६६०
श्री. चंद्रकांत घ. तागडे	कनिष्ठ सहाय्यक	मो. ९७३०९८२७१२
श्री. प्रणय बी. अलोने	कनिष्ठ सहाय्यक	मो. ७५८८११८०३०
श्रीमती प्रगती एस. नागदेवे	परिचर	मो. ७०३८५२०६३९

शाखा कोहमारा
C/o.श्री.प्रफुल डुंभरे, तुलशी नगर, गोदिया रोड, कोहमारा, जि. गोंदिया

श्री. संदिपकुमार बी. तिवाडे	शाखा व्यवस्थापक	मो. ९९२३१८६४३३
श्री. प्रशांत एस. खंडाईत	वरिष्ठ सहाय्यक	मो. ७७६८८०१८२४
श्री. ललित एस. मुंगमोडे	कनिष्ठ सहाय्यक	मो. ८६६८९४७४४२
कु. कल्याणी डी. ब्राम्हणकर	कनिष्ठ सहाय्यक	मो. ८७६७७६०४४६
श्री. अमोल आर. ठाकरे	कनिष्ठ सहाय्यक	मो. ९०९६२८०९०७
श्री. राहुल ए. खोटेले	परिचर	मो. ९४०५६५५५५९

शाखा पवनी
C/o.श्री.देवदासजी हटवार, दिवाणी न्यायालयासमोर, शिवाजी नगर, पवनी, जि. भंडारा.

श्री. मुकेश टी. नवखरे	शाखा व्यवस्थापक	मो. ९४२३३८०४००
कु. प्राची पी. देशमुख	वरिष्ठ सहाय्यक	मो. ७८२०९११०२५
श्री. दिनेश व्ही मोटघरे	कनिष्ठ सहाय्यक	मो. ९७६४७३४०९३
श्री. हितेश ई. सुखदेवे	कनिष्ठ सहाय्यक	मो. ९६७३८९६२७१
श्री. देवानंद एफ. नागपुरे	परिचर	मो. ९९२१५६१७३१

शाखा आमगांव
C/o.श्री. डिगेश्वर टेंभरे, भवभुती नगर, देवरी रोड, आमगांव, जि. गोंदिया.

श्रीमती जयश्री एन. मसराम	शाखा व्यवस्थापक	मो. ९४२२८३३४७८
श्री. प्रविण ए. बिसेन	वरिष्ठ सहाय्यक	मो. ८३९०७५३५३५
श्री. रोहन एस. जाधव	कनिष्ठ सहाय्यक	मो. ८७८८६९२३४२
श्री. कमलेशसिंह के. मच्छिरके	कनिष्ठ सहाय्यक	मो. ७६६६८८५४३०
श्री. डिगेश्वर के. पारधी	परिचर	मो. ९५४५७१४५१५

जिल्हा परिषद व शासकीय कर्मचारी सह. पतसंस्था मर्या. भंडारा

संस्थेच्या सभासदांकरीता मुदत ठेव, मासिक उत्पन्न ठेव, जिवन साफल्य ठेव, लखपती ठेव व अतिरिक्त ठेव योजना सुरु असुन नियम व अटी खालीलप्रमाणे

मुदत ठेव योजना :

१) २ वर्षापासुनच्या पुढील कालावधीकरीता मुदत ठेव योजनेकरीता ८% व्याजदर देय राहील.
२) सदर मुदत ठेव १ महिना किंवा अगोदर मागणी केल्यास त्यावर व्याज दिले जाणार नाही.
३) मुदत ठेव मुदत पुर्व मागणी करावयाचे असल्यास १५ दिवसांअगोदर संस्थेस अर्ज सादर करावा.
४) १ महिन्यानंतर मॅच्युरीटी दिनांकापुर्वी मुदत ठेव रक्कम परत मागीतल्यास त्यावर प्रस्तावित व्याजदरापेक्षा १% कमी व्याजदर देय राहील.
५) संस्थेकडुन व्याज आकारणी मध्ये चुका आढळुन आल्यास नियमानुसार व्याज देय राहील.
६) दामदुप्पट योजना : ८ वर्ष ११ महीना

मुदत ठेव (मासिक उत्पन्न) योजना :–

१) २ वर्षापासुनच्या पुढील कालावधीकरीता मुदत ठेव (मा.उ.) योजनेकरीता ८% व्याजदर देय राहील.
२) मुदत ठेवीत १ लक्ष रुपयाला ६६७/– याप्रमाणे द.मा. व्याज संस्थेतुन देण्यात येईल.
३) मुदत ठेव रक्कम १ महिना किंवा अगोदर मागणी केल्यास त्यावर व्याज दिले जाणार नाही.
४) मुदत ठेव मुदत पुर्व मागणी करावयाचे असल्यास १५ दिवसांअगोदर संस्थेस अर्ज सादर करावा.
५) १ महिन्यानंतर मॅच्युरीटी दिनांकापुर्वी मुदत ठेव रक्कम परत मागीतल्यास त्यावर प्रस्तावित व्याजदरापेक्षा १% कमी व्याजदर देय राहील.

जिवन साफल्य ठेव :– (१ वर्ष, ३ वर्ष, ५ वर्षाकरिता)

१) संस्थेच्या सभासदांकडून त्यांनी सादर केलेल्या अर्जानुसार ८% व्याजदराने १,३,५ वर्षीय जिवन साफल्य ठेव सभासदांचे पगारातून कपात करण्यात येईल.
२) जिवन साफल्य ठेव मुदत पूर्व बंद केल्यास कोणत्याही स्वरुपाची कपात करण्यात येणार नाही.

न्यु लखपती ठेव योजना :– संस्थेच्या सभासदांकरिता व सेवानिवृत्त सभासदांच्या सोईकरिता ८% व्याजदराने आकर्षक न्यु लखपती ठेव योजना सुरु करण्यात आली आहे.

अतिरीक्त ठेव योजना : संस्थेच्या सभासदांकरीता व सेवानितृत्त सभासदांच्या सोईकरीता नव्याने ७.५% व्याजदराने अतिरीक्त ठेव योजना सुरु करण्यात आली आहे.

संचालक मंडळ
जि.प. व शासकीय कर्मचारी सह. पतसंस्था मर्या. भंडारा

जि.प. व शासकीय कर्मचारी सह. पतसंस्था मर्या. भंडारा रजि. नं. ११५

नोंदणी क्रमांक : बी. एच. डी. – ११५
कार्यालय : विदर्भ हाऊसिंग बोर्ड कॉलनी,
जि.प. चौक, भंडारा – ४४१ ९०४

प्रति
श्री/श्रीमती _____